www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक **युवक आधार** मराठी
तरुणांचा बुलंद आवाज




मुख्य संपादक - भारती आमले  उपसंपादक - श्री विलास गायकवाड  कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे  निवासी संपादक- श्री राकेश पाटील  सह संपादक - श्री मुकुंद कांबळे  महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3  अंक : ४४  गुरुवार, दि. २३ ऑक्टोबर २०२५  किंमत : ४ रु  पृष्ठ : ८  RNI MAHMAR/2023/89514

# पनवेलमध्ये 'दिवाळी पहाट'ने सजली दीपावली

## राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या सुप्रसिद्ध गायिका बेला शेंडे यांच्या सुरेल स्वराची बरसात

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

दीपावलीची सोनेरी पहाट आणि राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या सुप्रसिद्ध गायिका बेला शेंडे यांच्या सुरेल स्वरांची बरसात अशा द्विगुणित आनंदात पनवेलकर रसिकांनी 'दिवाळी पहाट'चा मंत्रमुग्ध करणारा अनुभव घेतला. निमित्त होते ते लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पनेतून आणि पनवेल महानगरपालिका आयोजित व श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ प्रायोजित 'दिवाळी पहाट' अर्थात सुश्राव्य संगीत मैफिलचे.

पनवेल म्हणजे सांस्कृतिक चळवळ, त्यामुळे पनवेलमधील निसर्गरम्य अशा वडाळे तलाव येथे झालेल्या या कार्यक्रमाने नेहमीप्रमाणे पनवेलच्या संस्कृतीमध्ये भर घातली. दीपावली म्हंटली कि दिव्यांचा, आनंदाचा आणि संस्कृतीचा सण. या सणानिमित्त लहानग्यांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वत्र आनंद आणि विविध कार्यक्रमांची रेलचेल पहायला मिळते. त्यात सुरांच्या अविष्कारांनाही अनन्य साधारण महत्व आहे. या 'दिवाळी पहाट' मध्ये सप्तसुरांची उधळण करत दिवाळीला सुमधुर सुरांचा साज पनवेलकरांना अनुभवायला मिळाला. निरागस सुरांचा फराळ, विरळ धुक्याची झालर, त्यात सुटलेला प्रसन्न पहाट वारा, सुर्याची सुवर्ण किरणे आणि क्षितिजाला गवसणी घालणाऱ्या सुप्रसिद्ध गायिका बेला शेंडे व श्री. जयदीप यांच्या सुमधूर सुरावर रसिकांनी भरभरून दाद दिली. यावेळी संपुर्ण सात्विक व आल्हाददायी, मनमोहक वातावरणाने पनवेल मंत्रमुग्ध झाले होते. या सुरेल मैफिलीचे पनवेलकरांनी कुटुंबासह व मित्रपरिवारासह मनमुराद आनंद घेतला. दिवाळी पहाटेचे एक



अनोखे नाते आहे. दिवाळी अंकांसोबतच मराठी-हिंदी भावस्पर्शी गाण्यांनी दिवाळीची पहाट सुरेल करण्याची परंपरा जपायला मराठी रसिकांना आवडते. या दिवाळी पहाटमध्ये गाणी अप्रतिम सादर करून रसिकांमध्ये चैतन्य खुलविले. त्याचबरोबरीने ताल वाद्यवृंद समूहानेही आपल्या वादनातून उपस्थितांची वाहवा मिळवली. पहाट एवढी रंगली होती की, रसिकजन सुरांच्या ठेक्यात आणि सुरांनी त्यांच्या हृदयात घर केले होते. असे अनेक सुरेल संगीताचा खजिना यावेळी सादर होत असताना रसिकांनीही भरभरून दाद दिली. तसेच निवेदक विनित देव यांनी आपल्या उत्तम निवेदन करत या कार्यक्रमात आणखी रंगत आणली. उदंड प्रतिसाद लाभलेल्या या दिवाळी पहाटची सुरुवात सूर निरागस हो गणपती, कानडा राजा पंढरीचा, वाहतो या इथे ज्ञानरूपी झरा, धुंद होते शब्द सारे, आज म्हारे घर आओ, पांडुरंग नामी लागला ध्यास, मन उधाण वाऱ्याचे, स्वर सुखाची सावली, ओळया सांजवेळी, उरले उरात काही, शरद सुंदर, मला वेड लागले प्रेमाचे, आता वाजले कि बारा, अप्सरा आली, या गाण्यांनी होत समारोप पसायदानाने झाले.

या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची मान्यवर म्हणून प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे जेष्ठ नेते व माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, प्रांताधिकारी पवन चांडक, महानारपालिकेचे अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये, भाजपचे माजी शहर अध्यक्ष जयंत पगडे, अनिल भगत, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ऍड. प्रकाश बिनेदार, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, नविन पनवेल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ यांच्यासह विविध संस्था संघटनेचे पदाधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी उपस्थित होते. यावेळीही व्यासपीठ अत्यंत आकर्षक होते. देवीचे रूप आणि पैठणीचा साज विशेष आकर्षणे होती. त्याचबरोबर रसिकांसाठी ४५०० हजार खुर्च्यांची आसन व्यवस्था करण्यात आली होती.

रेकॉर्डब्रेक रसिकांची गर्दी झाल्याने आसनव्यवस्था पूर्णपणे भरून गेली होती. त्यामुळे रसिकांनी परिसरात भेटेल त्या जागी काहींनी बसून तर काहींनी उभे राहून या कार्यक्रमाचा मनमुरादपणे आनंद घेतला. उत्तम आयोजन आणि संयोजनात झालेल्या यंदाच्या या दिवाळी पहाटेचे ९ वे वर्ष होते.

> पनवेल सांस्कृतिक चळवळ जपणारे आहे. आजच्या कार्यक्रमाला पाच हजारांहून अधिक नागरिकांनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शवून भरभरून प्रतिसाद दिला. त्यामुळे कार्यक्रमाची जागा अपुरी पडली. अशाच प्रकारच्या उपक्रमांद्वारे आपण पनवेलची सांस्कृतिक चळवळ अधिक वृद्धिंगत करत राहू, उदंड प्रतिसादाबद्दल सर्वांचे मन:पूर्वक आभार.
> — परेश ठाकूर, माजी सभागृहनेते-पनवेल महानगरपालिका

> पनवेलकर सांस्कृतिक वारसा जपणारे आहेत. त्यामुळे त्यांनी या कार्यक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला. मी आमदार प्रशांत ठाकूर, आयुक्त मंगेश चितळे, माजी सभागृहनेते परेश ठाकूर आणि समस्त पनवेलकरांचे आभार मानते. सुंदर दिवाळी पहाट चे आयोजन आणि चांगला रसिकवर्ग असल्याने पुन्हा पुन्हा यावे असे मनापासून वाटते.
> — सुप्रसिद्ध गायिका बेला शेंडे

# रायगड सम्राट दिवाळी अंकाचे प्रकाशन रामशेठ ठाकुर यांच्या शुभहस्ते

**दैनिक युवक आधार**
**पनवेल /प्रतिनिधी**

शंकर वायदंडे संपादित वर्ष चौथी रायगड सम्राट दिवाळी अंकाचे प्रकाशन मंगळवार दि २१ ऑक्टोबर रोजी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शुभहस्ते करण्यात आले

या दिवाळी अंकाचे कौतुक रामशेठ ठाकूर यांनी केले असून रायगड सम्राट च्या वाचकांना व सर्व नागरिकांना शुभेच्छा दिल्या

यावेळी पनवेल तालुका पत्रकार संघर्ष समितीचे अध्यक्ष निलेश सोनावणे खारघर पत्रकार संघाचे अध्यक्ष आप्पासाहेब मगर आदिवासी सम्राट संपादक



गणपत वारगडा पत्रकार पत्रकार अण्णासाहेब आहेर,शैलेश चव्हाण, पत्रकार गौरव जहागीरदार पत्रकार दीपक घरत, पत्रकार राजेंद्र कांबळे युवक आधार संपादक संतोष आमले पत्रकार संजय महाडिक पत्रकार संदेश सोनमळे,पत्रकार शेखर सपानी,पत्रकार सनीप कलोते, पत्रकार सुनील वारगडा पत्रकार विकास म्हात्रे पत्रकार दिपाली पारस्कर आधी पत्रकारांच्या उपस्थितीत रायगड सम्राट चा प्रकाशन सोहळा पार पडला

# कॅन्सरग्रस्त रुग्णांच्या हस्ते 'धगधगती मुंबई' दिवाळी विशेषांकाचे प्रकाशन

## रुग्णांच्या हस्ते दिवाळी अंकाचे प्रकाशन या कल्पनेचे उपस्थित मान्यवरांनी केले कौतुक

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**

सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम म्हणून 'धगधगती मुंबई' या वृत्तपत्राच्या वतीने प्रकाशित होणाऱ्या दिवाळी विशेषांकाचे प्रकाशन परळ येथील श्री संत गाडगे महाराज धर्मशाळा ट्रस्ट येथे एक आगळयावेगळ्या पद्धतीने करण्यात आले. या वेळी विशेषांकाचे प्रकाशन टाटा कॅन्सर रुग्णालयात उपचारासाठी आलेल्या कॅन्सरग्रस्त रुग्णांच्या हस्ते करण्यात आले.परळ येथील श्री संत गाडगे महाराज धर्मशाळा ट्रस्टमध्ये बाहेरगावावरून आलेले



अनेक रुग्ण व त्यांचे नातेवाईक उपचार काळात वास्तव्य करतात. त्यांच्या जीवनात थोडासा आनंदाचा क्षण निर्माण करण्यासाठी 'धगधगती मुंबई' वृत्तपत्राच्या टीमने हा उपक्रम राबविला. प्रकाशन सोहळ्यानंतर रुग्णांना दिवाळी विशेषांकाचे वाटप,तसेच लाडू वाटप करण्यात आले तसेच छोटीशी आर्थिक मदत देऊन त्यांना मानसिक आधार देण्याचा प्रयत्नही करण्यात आला.या प्रसंगी माहीम विधानसभा निरीक्षक (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे) यशवंत विचले, ज्येष्ठ पत्रकार प्रा. हेमंत सामंत, तसेच 'धगधगती मुंबई'चे संपादक भीमराव धुळप आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.गणांच्या हस्ते दिवाळी अंकाचे प्रकाशन ही कल्पना उपस्थित मान्यवरांनी कौतुकास्पद ठरवली. समाजातील दुर्बल घटकांना आनंदाचे क्षण देणाऱ्या या उपक्रमाबद्दल सर्वत्र 'धगधगती मुंबई'च्या टीमचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# प्लास्टिकमुक्तीसाठी सरसावला सारा जरंडी गाव !

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**

**सोयगाव :** तालुक्यातील जरंडी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत तालुक्यातील जरंडी ग्रामपंचायतीने २० ऑक्टोबर रोजी प्लास्टिक बंदीची अंमलबजावणी सुरू केली. गावात दिवाळीनिमित्ताने आयोजित कार्यक्रमात प्लास्टिक पत्रावळया ऐवजी स्टीलच्या ताटाचा उपयोग करण्याचा निर्णय घेतला आहे.जरंडी गावात विविध सार्वजनिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यानिमित्त जेवणाकरिता प्लास्टिकच्या पत्रावाळया,प्लास्टिक द्रोण आणि प्लास्टिक ग्लासचा सर्रास वापर होत होता.कार्यक्रमानंतर मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक कचरा तयार होऊन तो गटारीमध्ये




जाऊन पर्यावरणाचे नुकसान होत असे.ही बाब ग्रामस्थांनी लक्षात घेत गाव प्लास्टिकमुक्त करण्यासाठी पुढाकार घेतला. या उपक्रमाला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी तर प्लास्टिकमुक्तीची घोषणा करत अंमलबजावणी सुरू केली. दरम्यान, ग्रामपंचायतीने "प्लास्टिक मुक्त जरंडी स्वच्छ जरंडी" हा नारा दिला आहे. शाळांमध्ये विद्यार्थी वर्गाला प्लास्टिकच्या दुष्परिणामांबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच गावात नियमित प्रबोधन फलक आणि भित्तीचित्रे लावून जनजागृती केली जाणार आहे. दिवाळी सणाच्या जेवणासाठी ग्रामस्थांना स्टीलच्या ताटाचा वापर करण्याचा निर्णय केला.

**स्वच्छता अभियानाशी जोडलेला उपक्रम**

दिवाळी सणाचा दिवशी (दि.२०) गावभर स्वच्छता मोहीमही राबविण्यात आली. प्लास्टिक कचरा गोळा करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली. ग्रामपंचायतीने जाहीर केले की, पुढील काळात गावात प्लास्टिकचा वापर आढळल्यास दंड आकारण्याचा कठोर निर्णयही ग्रामस्थांनी घेतला आहे.

**भविष्यातील योजना**

ग्रामपंचायतीने जाहीर केले की, आगामी सर्व धार्मिक, सामाजिक, आणि शासकीय कार्यक्रमांमध्ये प्लास्टिकचा वापर पूर्णपणे बंद राहील. तसेच गावात घनकचरा व्यवस्थापन केंद्र, कंपोस्ट खड्डे, आणि हरित ग्राम योजना राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे जरंडी ग्रामपंचायत केवळ प्लास्टिकमुक्त बनली नाही, तर इतर ग्रामपंचायतींसाठीही प्रेरणादायी आदर्श ठरत आहे.

# पनवेलमध्ये गोदरेज कॅपिटलची नवीन गृहवित्त मोहीम

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

गोदरेज इंडस्ट्रीज ग्रुपची वित्तीय सेवा शाखा असलेल्या गोदरेज कॅपिटलने त्यांच्या उपकंपनी गोदरेज हाऊसिंग फायनान्समार्फत 'पक्कापता' अर्थात मालकीचे घर ही नवीन मोहीम सुरू केली आहे. पनवेलसह देशातील उदयोन्मुख बाजारपेठांमध्ये परवडणाऱ्या गृहवित्त उपाययोजना पुरवणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

ही मोहीम पहिल्यांदा घर खरेदी करणाऱ्या ग्राहकांच्या भावनिक प्रवासाचे सुंदर चित्रण करते. तसेच भाड्याच्या जागेतून स्वतःच्या मालकीच्या घरात जाण्यासाठी गोदरेज हाऊसिंग फायनान्सला एक विश्वासार्ह भागीदार म्हणून मान्यता देते.या मोहिमेच्या केंद्रस्थानी एक साधा, सोपा पण सखोल दृष्टिकोन आहे: 'पक्कापता' म्हणजेच कायम स्वरूपी पत्ता, हे भारतीय कुटुंबांचे सर्वात मोठे स्वप्न असते. पारंपरिकपणे घर खरेदीसाठी चांगला मुहूर्त म्हणून दिवाळी आणि धनत्रयोदशीचे महत्त्व लक्षात घेत ही मोहीम धोरणात्मक रित्या आखण्यात आली आहे. परवडणाऱ्या गृहनिर्माण वित्तपुरवठ्यासाठी ग्राहक-



प्रथम दृष्टिकोन अधोरेखित करून या मानसिकतेचा फायदा करून घेण्याचा कंपनीचा उद्देश आहे, ज्यामुळे टियर-२ शहरांमध्ये घर घेणे अधिक सोपे होईल.

कारण तेथील घरे आता परवडणाऱ्या दरांमध्ये उपलब्ध आहेत.

## दिवाळी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर मराठी चित्रपट सृष्टीला नवी दिशा



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी / लोणी**

दिवाळीच्या मंगल, क्षणी, भावड्या या बहुचर्चित मराठी चित्रपटाचा भव्य शुभमुहूर्त अत्यंत उत्साहात पार पडला ह. भ. प इंदोरीकर महाराज देशमुख यांच्या शुभ हस्ते त्यांच्या विनोदी प्रबोधन पर शैलीने वातावरण अधिकच रंगतदार बनले या चित्रपटाचे मुख्य भूमिका आणि दिग्दर्शक आहेत प्रमोद पंडित ज्यांनी या चित्रपटात सामाजिक संदेशासह मनोरंजनाची मेजवानी देण्याचे वचन दिले आहे चित्रपटाचे निर्माते आबा निर्मळ यांनी या चित्रपटाबद्दल सांगितले की हा चित्रपट केवळ मनोरंजनासाठी नसून तर प्रत्येक मराठी माणसाच्या भावनांना स्पर्श करणारा आहे त्यांना साथ दिली सहनिर्माते ज्ञानदेव शिंदे आणि प्रोडक्शन मॅनेजर ज्ञानेश्वर साबळे,यांनी यांच्या प्रयत्नांनी हा चित्रपट आणखी भव्य होणार आहे या सोहळ्याला अनेक मान्यवर कलाकार व साहित्यिक गडकिल्ल्यांचे पुस्तकाचे प्रकाशन झाले भावड्या चित्रपट हा प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवण्यासाठी येणार आहे

## श्री.भास्कर विठाबाई भिवा पाटील यांना

# रायगड जिल्हा शिवभूमी आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित...

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी.भोईर**

रायगड जिल्हा परिषदे मार्फत देण्यात येणारा सन २०२४/२५ चा रायगड जिल्हा शिवभूमी आदर्श शिक्षक पुरस्कार मांगरुळ शाळेचे तंत्रस्नेही,उपक्रमशील शिक्षक श्री.भास्कर पाटील गुरुजी यांना महाराष्ट्र

राज्य महिला व बालकल्याण मंत्री मा.आदितीताई तटकरे यांच्या शुभ हस्ते दिनांक १३/१०/२०२५ रोजी सपत्नीक समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला.

यावेळी महाराष्ट्र राज्य रोजगार हमी फलोत्पादन मंत्री भरतशेठ गोगावले,आमदार महेंद्रशेठ दळवी,जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले,उप मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, प्राथमिक शिक्षणाधिकारी ललिता दहितुले ,माध्यमिक शिक्षणाधिकारी महारुद्र नाळे,आशा गरुड व उपशिक्षणाधिकिरी संतोष शेडगे आदि मान्यवर उपस्थित होते.

रायबादेवीच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या रावे गावचे सुपुत्र श्री.भास्कर विठाबाई भिवा पाटील यांनी २० जून १९८९ रोजी शिक्षक सेवेला प्रारंभ केला.आपल्या ३५ वर्षांच्या प्रेरणादायी शैक्षणिक वाटचालीस पोलादपूर तालुक्यातून सुरुवात केली.हे एक अभ्यासू विनयशील व्यक्तिमत्त्व आहेत. यांना वक्तृत्व कला ,गायनव नाट्यक्षेत्राची विशेष आवड आहे.समाजाबरोबर यांची उत्तम नाळ जोडलेली आहे.शाळेसाठी समाजाचे उत्तम सहकार्य घेऊन वस्तूरुपाने व रोख रक्कम प्राप्त करून शाळा डिजिटल केलेली आहे. *_माझी ई-शाळा_* उपक्रम चालू केला.समाज व ग्रामस्थ यांच्या सहकार्याने शाळेची पटसंख्या वाढविली. विज्ञान प्रदर्शनात सक्रिय सहभाग, जिल्हास्तरीय बाल साहित्य संमेलनाचे यशस्वी आयोजन व सहभाग घेतला.ई लर्निंग, संगणकाद्वारे विद्यार्थी मार्गदर्शन, तालुका व केंद्र स्तरावर गणित व इंग्रजी पेटी प्रशिक्षणात सहभाग व मार्गदर्शन.

कोरोना काळात सामाजिक बांधिलकी जपत खारपाडा चेक पोस्ट वर कर्तव्य बजावले.

मानवतेची चाड म्हणून महाड पूरग्रस्त मदत कार्यात सक्रिय सहभाग घेतला. त्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व ग्रामस्थांना आनंद झाला व त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करण्यात आला.








## रयत क्रांती संघटनेला आपल्या महायुतीकडून मंठा पंचायत समिती करिता सोडण्यात यावे - जिल्हाध्यक्ष नामदेव मंडपे

**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर** : रयत क्रांती संघटनेला आपल्या महायुतीकडून मंठा पंचायत समिती करिता सोडण्यात यावे मागील अनेक वर्षापासून महायुतीतील घटक पक्ष म्हणून रयत क्रांती संघटना आपल्या महायुतीच्या प्रत्येक निवडणुकीत लोकसभा विधानसभा प्रमाणित पणे प्रचार करत मोठ्या मताधिक्याने महायुतीतील उमेदवार निवडून आणण्याकरिता प्रयत्न केले असून यावेळेस जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीसाठी आमचे रयत क्रांती संघटनेचे कार्यकर्ते यांची निवडणूक लढवण्याची तयारी केलेली असून ते महायुतीकडून मिळण्यात अत्यंत उत्सुक आहेत तरी आपण महायुतीतील आपला घटक पक्ष म्हणून रयत क्रांती संघटनेला या निवडणुकीत सामावून घेण्यात यावे जिल्हा परिषद व पंचायत समिती वाटुर पंचायत समिती व आंबा पंचायत समिती गोसावी पांगरी पंचायत समिती मंठा आपल्या सहकार्याने मोठ्या मताधिक्याने निवडून येऊ असा विश्वास देतो

आपला - रयत क्रांती संघटना जिल्हाध्यक्ष जालना नामदेव विनायक राव मंडपे



## आदिवासी संघटनेचे अध्यक्ष, पत्रकार गणपत वारगडा यांना ब्ल्यू पँथर्सचा 'मौल्यवान रत्न' पुरस्कार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

पनवेल तालुक्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चलवळीत सक्रिय असणारे पत्रकार, संगीत, गायन आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यासाठी ब्ल्यू पँथर्स या संघटनेने विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या विशेष कार्यक्रमात आदिवासी समाजाला न्याय देणारे आणि सत्यताने चलवळीत सक्रिय असणारे आदिवासी समन्वय समिती रायगड संघटनेचे अध्यक्ष, पत्रकार गणपत वारगडा यांनी सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय काम करत असल्याने 'ब्ल्यू पँथर्सचा 'मौल्यवान रत्न' पुरस्कार कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनील सोनावळे यांच्या हस्ते पनवेल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे देण्यात आले.



या कार्यक्रमाचे अध्यक्ष नरेंद्र गायकवाड होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल शहर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक नितीन ठाकरे, पनवेल महानगरपालिकेचे माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार, विजय गायकवाड, सुनील सोनावणे, पत्रकार संजय कदम, महेश साळुंखे, कमलाकर कांबळे, नितीन कांबळे, नवनीत गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राज सदावर्ते यांनी केले, तर कृष्णा गायकवाड यांनी आभार मानले.

# वामन नगर येथे श्री पवन जाधव मित्र मंडळाच्या वतीने दिवाळीनिमित्त साडी व फराळ वाटप

**दैनिक युवक आधार**

**लातूर :** दिवाळी हा आनंद, प्रकाश आणि प्रेमाचा सण असला तरी अतिवृष्टीमुळे अनेक कुटुंबांच्या घरात यावर्षी अंधाराचे सावट पसरले होते. मात्र, या अंधारात प्रकाशाची किरणे ठरले श्री पवन जाधव मित्र मंडळ, वरवंटी या मंडळाच्या वतीने वामन नगरच्या गरीब व गरजू कुटुंबांना साडी व फराळाचे वाटप करून एक आगळावेगळा उपक्रम राबविण्यात आला.

अतिवृष्टीमुळे लातूर तालुक्यातील अनेक घरांमध्ये पाणी शिरले, जनजीवन विस्कळीत झाले आणि काही कुटुंबांना दिवाळीचा आनंदही उपभोगता आला नाही. या परिस्थितीची जाणीव ठेवून, श्री पवन जाधव मित्र मंडळाने समाजातील गरजूंना आनंद वाटण्याचा संकल्प केला आणि दिवाळीचा प्रकाश त्यांच्या घरी पोहोचविला.



या उपक्रमात साडी व फराळाचे वाटप करण्यात आले, ज्यामुळे अनेकांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंदाची लकेर उमटली. कार्यक्रमावेळी वरवंटी ग्रामपंचायतीचे उपसरपंच श्री राजेश पाटील, तसेच श्री पवन जाधव मित्र मंडळाचे सदस्य अजय जाधव, अजित जाधव, रवि जाधव, प्रेमनाथ राठोड, रवि राठोड, समीर काझी, प्रदीप जाधव, आयुष जाधव, वैभव जाधव, प्रणव जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

स्थानिक नागरिकांनी या सामाजिक उपक्रमाचे मनापासून कौतुक केले.

"दिवाळीच्या काळात आमच्यासारख्या गरजू कुटुंबांना मदतीचा हात दिल्याबद्दल आम्ही मनःपूर्वक आभारी आहोत," असे वरवंटी-वामन नगर येथील रहिवाशांनी सांगितले. या उपक्रमातून समाजातील संवेदनशीलतेचा आणि एकोप्याचा सुंदर संदेश देण्यात आला आहे. श्री पवन जाधव मित्र मंडळाचे हे कार्य नक्कीच इतरांसाठी प्रेरणादायी ठरेल अशी अपेक्षा.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# वारकरी संप्रदायाचा वारसा अखंड ठेवण्यासाठी बाल कीर्तनकार मधुसुदन महाराज नाठे सरसावले पुढे

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी- कृष्णा गायकवाड(पिंपळगाव बसवंत)**

अखंड वारकरी संप्रदायाचा वारसा ठेवण्यासाठी भगवी पताका खांद्यावर घेत बाल कीर्तनकार मधुसुदन महाराज नाठे पुढे सरसावले आहेत याबाबत सविस्तर.

ह.भ.प. अनंता महाराज नाठे (रा. वडपाडा, ता. सुरगाणा)यांचे चिरंजीव बाल किर्तनकार ह.भ.प. मधुसूदन महाराज नाठे यांनी वारकरी संप्रदायाच्या आध्यात्मिक परंपरेत आपले पाऊल टाकले आहे.

त्र्यंबकेश्वर येथील ज्ञानराज माऊली आध्यात्मिक गुरूकुलात त्यांनी वारकरी संप्रदायाचे शिक्षण घेतले असून, आज ते बाल किर्तनकार म्हणून समाजामध्ये कीर्तनाच्या माध्यमातून अध्यात्माचा संदेश पोहोचवीत आहेत."असा लाभ जो चुकला, तुका म्हणे वाया गेला!" या तत्त्ववाक्याने प्रेरित होऊन ते वारकरी परंपरेचा वारसा पुढे नेत आहेत.

अनंता महाराज नाठे हे स्वतः जनसेवा व वारकरी संप्रदाय यांच्या कार्यात पूर्वीपासून सक्रिय आहेत. त्यांचे वडील ह.भ.प. वैकुंठवासी त्र्यंबक नाठे (पूर्णानंद महाराज) यांनी सन 1972 पासून पंढरपूर-त्र्यंबकेश्वर वारी चालू केली. तसेच सौराष्ट्र, गुजरात, विदर्भ, कोकण व आदिवासी भागात वारकरी संप्रदायाचा प्रसार करून व्यसनमुक्त समाजनिर्मितीचे कार्य केले.

ही परंपरा पुढे नेत ह.भ.प. अनंता महाराज नाठे यांनी वारकरी संप्रदायाचा वारसा अखंड ठेवला असून, आता त्यांचे सुपुत्र मधुसूदन महाराज नाठे हे भगवी पताका खांद्यावर घेत समाजाला दिशा देण्यासाठी पुढे सरसावले आहेत.

अखंड सेवाभावी संस्था जोरणपाडा श्री नामदेव गावित यांच्यावतीने बाल कीर्तनकार मधुसूदन नाठे यांचा लवकरच सत्कार सोहळा करण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे.



# मराठी संस्कृती प्रतिष्ठान, श्रीवर्धन

## गडकिल्ले स्पर्धा २०२५ – परंपरेचा अभिमान आणि गौरव

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित**

श्रीवर्धन येथील मराठी संस्कृती प्रतिष्ठान तर्फे दरवर्षी प्रमाणे यंदा देखील "गडकिल्ले स्पर्धा २०२५" उत्साहात पार पडली. या स्पर्धेचे उद्दिष्ट महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासातील गडकिल्ल्यांची परंपरा जपणे व नव्या पिढीत त्याबद्दल अभिमान निर्माण करणे हे आहे.

या स्पर्धेत वैयक्तिक व सांघिक अशा दोन गटांमध्ये स्पर्धा घेण्यात आली होती. एकूण २७ स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवून ऐतिहासिक किल्ल्यांच्या आकर्षक प्रतिकृती साकारल्या.




**पारितोषिक वितरण**

**वैयक्तिक गटासाठी:**

प्रथम पारितोषिक (₹३,००० व भव्य चषक) — स्नेहा व रोहित काशिनाथ भोगल (विजयदुर्ग किल्ला)

द्वितीय पारितोषिक (₹२,५०० व भव्य चषक) — वीर काशिनाथ गुरव (पद्मदुर्ग किल्ला)

तृतीय पारितोषिक (₹२,००० व भव्य चषक) — तनुज व तनया हेमंत गुरव (अजिंक्यतारा किल्ला)

उत्तेजनार्थ (₹५०० व भव्य चषक) — श्रीराज वीरेंद्र वाणी (सिंधुदुर्ग किल्ला) व वीर भगत आणि आरह खराड (रायगड किल्ला)

**सांघिक गटासाठी:**

प्रथम पारितोषिक (₹३,००० व भव्य चषक) — विठ्ठल आळी निवासी मित्र मंडळ (पद्मदुर्ग किल्ला)

द्वितीय पारितोषिक (₹२,५०० व भव्य चषक) — एकावरा क्रीडा मंडळ, जिवनेश्वर आळी (पुरंदर किल्ला)

उत्तेजनार्थ (₹५०० व भव्य चषक) — पेशवे आळी मित्र मंडळ (जंजिरा किल्ला)

सर्व स्पर्धकांना प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले.

**परीक्षक मंडळ**

या स्पर्धेचे परीक्षण दिनांक २० ऑक्टोबर २०२५ रोजी करण्यात आले. परीक्षक म्हणून

१. श्री. सचिन करडे (गडकिल्ले अभ्यासक, शिवव्याख्याते)

२. श्री. दशरथ कातकर सर

३. श्री. जयवंत लाखन सर

या तिघा मान्यवरांनी परीक्षकपद भूषवले आणि स्पर्धकांना मार्गदर्शन केले.

**बक्षीस वितरण व सांस्कृतिक कार्यक्रम**

२१ ऑक्टोबर २०२५, लक्ष्मीपूजनाच्या मुहूर्तावर, आई सोमजाई देवी मंदिर येथे सायंकाळी ७ वाजता भव्य बक्षीस वितरण समारंभ पार पडला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्रतिष्ठानतर्फे भव्य दीपोत्सव साजरा करण्यात आला. त्यानंतर "स्वरगंधर्व मराठी गाण्यांची सुरेल मैफिल" या सांगीतिक कार्यक्रमाने उपस्थित प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले.

**परंपरेचा गौरव**

मराठी संस्कृती प्रतिष्ठान श्रीवर्धनतर्फे ही गडकिल्ले स्पर्धा गेल्या १७ वर्षांपासून सातत्याने राबविण्यात येत आहे.

प्रत्येक वर्षी या स्पर्धेतून मराठी संस्कृतीचा वारसा जिवंत ठेवण्याचे कार्य प्रतिष्ठान समर्थपणे पार पाडत आहे.

# वंचित बहुजन आघाडी जालना जिल्हा (पूर्व) अध्यक्षपदी रामप्रसाद थोरात सर यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**जालना(अशोक ठोके)**

वंचित बहुजन आघाडीच्या जालना जिल्हा (पूर्व)च्या अध्यक्षपदी परतुरचे वंचित बहुजन आघाडीचे नेते तथा माजी सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती आष्टीचे रामप्रसाद किसनराव थोरात यांची निवड वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रद्धेय बाळासाहेबजी आंबेडकर यांच्या आदेशानुसार व प्राध्यापक किसन चव्हाण सर (महासचिव वंचित बहुजन आघाडी महाराष्ट्र प्रदेश) यांच्या पत्रानवे दिनांक 20ऑक्टोबर 2025 रोजी निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणूक 2024 मध्ये वंचित बहुजन आघाडीच्या वतीने रामप्रसाद थोरात



यांनी परतुर मतदारसंघातून निवडणूक लढवत तीस हजार मते मिळवत दमदार लढत दिली होती.परतुर पंचायत समितीचे उपसभापती म्हणून तसेच आष्टी ग्रामपंचायत चे सरपंच म्हणून देखील त्यांनी काम केलेल आहे. परतूर मतदारसंघात विधानसभा निवडणुकीनंतर प्रमुख विरोधी उमेदवार म्हणून रामप्रसाद थोरात यांची ओळख निर्माण झाली आहे.त्यांच्या या निवडीने मतदार संघात वंचित बहुजन आघाडीचा प्रवास चांगल्या पद्धतीचा होईल अशी आशा आहे. त्यांच्यासोबत महासचिव म्हणून डॉ. किशोर त्रिभुवन, उपाध्यक्षपदी परमेश्वर खरात, भारत उघडे, कोषाध्यक्ष म्हणून सतीश खरात आणि सचिव म्हणून जमीर शेख यांची सुद्धा निवड करण्यात आली आहे. नवनिर्वाचित अध्यक्ष रामप्रसाद थोरात सर व सर्व कार्यकारिणीचे सर्वच स्थरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# गावकऱ्यांसोबत महाराष्ट्र काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची दिवाळी

**दैनिक युवक आधार**
**मुंबई संतोष पाटील**

दिवाळी म्हणजे केवळ सण नव्हे, तर माणसांमधील नाळ अधिक घट्ट करणारा उत्सव आहे. मागील २७ वर्षांपासून महाराष्ट्र काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हे सातपुडा पर्वतरांगांतील भिंगारा, चालीस टपरी, गोमाल या गावांतील गावकऱ्यांसोबत ते दर दिवाळीला ३ दिवस मुक्काम करतात. या मुक्कामाच्या वेळी ते स्थानिकांसोबत विशेषतः लहान मुलं-मुली यांच्यासोबत मनोभावे दिवाळी साजरी करतात. या दिवाळीला देखील त्यांनी ही परंपरा राखली आहे.

सातपुडा पर्वतरांग ही मध्य भारतातील एक विस्तृत आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध अशी पर्वतरांग आहे. या पर्वतरांगांमध्ये अनेक आदिवासी जमातींचे पारंपरिकरीत्या वास्तव्य आहे. या समाजांचे निसर्गाशी अतूट नाते आहे. ते पर्वत, वने, झरे, शेती व निसर्गाला जिवंत देवता मानून त्यांचे संवर्धन आणि संरक्षण करतात. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचेही या आदिवासी बंधू भगिणींशी अतूट नाते निर्माण झाले आहे. प्रत्येक दिवाळीला हे नाते अधिक घट्ट होत आहे.



# शिक्षक गजानन घुगे यांचे निधन

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**

**शेलुबाजार :** लक्ष्मी चंद्र कनिष्ठ महाविद्यालय शेलु बाजार संस्थेतील सहकारी शिक्षक स्व. गजानन सदाशिवराव घुगे यांचे दिनांक 17. रोजी हृदयविकाराच्या झटक्याने वयाच्या 45 व्या वर्षी दुःखद निधन झाले त्यांच्या पश्चात पत्नी.

मूल–मुली असा मोठा आप्त परिवारातून ते होते. ग्राम एरंडा येथील रहिवासी असून निधनाची वार्ता कळतात संपूर्ण गाव तसेच समाज बंधू व त्यांचे चाहते वर्ग. लक्ष्मीचंद कनिष्ठ महाविद्यालयाचे



सर्वच पदाधिकारी तसेच संस्थेचे अध्यक्ष. तथा पर्यवेक्षक मुख्याध्यापक. शिक्षक आणि शिक्षिका तसेच सर्वच हितचिंतक विद्यार्थी मंडळी यांनी अशा आकस्मित निधनाची वार्ता करतात सर्वांच्या डोळ्यात अश्रू वाहत गेले. व अजून त्या विधी दरम्यान भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली...!

# जनतेची सुरक्षा हीच पोलिसाची दिवाळी – ठाणेदार रामेश्वर चव्हाण

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**

**रिसोड :** आमच्यासाठी पोलीस व्हॅनवरील लुकलुकणारा दिवा म्हणजे आकाश कंदील... पोलीस व्हॅनचा सायरनचा आवाज म्हणजे फटाक्याचा आवाज... संकटात सापडलेला आणि आम्ही वाचवलेला आत्या व्यस्त हीच आमची दिवाळी कोणताही सण, उत्सव असला तरी पोलीस कुटुंबापासून दूर कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचे काम करत असतात. सध्या प्रत्येक जण जोरदार दिवाळी सेलिब्रेशन करत असल्यास 'जनतेची सुरक्षा हीच आमची दिवाळी' म्हणून पोलीस चोख कर्तव्य बजावत आहेत. जनता आनंदित तर आमची दिवाळी आनंदित जाईल, पोलीस ऑनड्युटी चोवीस तास काम करतात. कामाचे तास निश्चित नसल्याने ड्युटी संपल्यानंतर अचानक अनुसूचित प्रकार घडल्यास पुन्हा बंदोबस्तावर जावे लागते. सण उत्सवात सामायिक सुट्ट्याही रद्द होतात. अहो रात्र अंगावर खाकी युनिफॉर्म घालून जनतेच्या सुरक्षेतेची धुरा सांभाळणारे पोलीस घरी एखाद्या महत्त्वाचा कार्यक्रम असला तरी आधी कर्तव्याला प्राधान्य देतात. कुटुंबासोबत सण,उत्सव साजरी करण्याची संधी पोलिसांना कदाचितच लाभते उद्या दिवाळीची सर्वत्र धामधूम असून प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद ओसाडून वाहत आहे. दिव्याच्या रोषणाईने परिसर उजळला असून लहानापासून जेष्ठापर्यंत सर्वजण दिवाळीची मज्जा लुटत आहेत. मात्र ही दिवाळी शांततेत पार पाडण्यासाठी पोलीस चोख कर्तव्य बजावत आहेत. कुटुंबासोबत दिवाळी साजरी करण्यासाठी प्रत्येक पोलिसाला सुट्टी मिळणे शक्य नाही. अचानक काही घडल्यास मनुष्यबळाची कमतरता भासू शकते. पोलीस ठाण्यापासून जवळ राहण्याच्या पोलिसांना थोडा वेळ घरी जाण्याची संधी मिळते. मात्र अन्य कर्मचारी दिवाळीतही ड्युटी करतात. दिवाळीतही कर्मचारी अहोरात्र कर्तव्यावर असतात. वाहतूक मार्गी लागण्यासाठी दिवाळीतही बाजारपेठेत नागरिकांची गर्दी उसळलेली असते. शिवाय, दिवाळीत नवीन कपडे घालून दिवाळी साजरी करण्यासाठी रस्त्यावर जमतात. अशावेळी मोठ्या प्रमाणावर वाहतूककोडी होते. नागरिकांना निर्विघ्नपणे दिवाळीची मज्जा लुटता यावी आणि वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी वाहतूक पोलिसाकडून विशेष लक्ष दिले जाते. महिला पोलीस कर्मचारी देखील वाहतुकीच्या नियोजनासाठी तेनात



असतात. त्यामुळे वाहतूक पोलिसांना ही दिवाळीत घरी वेळ देता नाही. जीवित आणि मालमत्तेची हानी होऊन देणे आणि जनतेचे रक्षण करणे पोलिसाचे पहिले कर्तव्य असून हीच आमची दिवाळी. नागरिक आनंदित तर पोलीस आनंदित. सण, उत्सवात महिला दागिने परिधान करतात. मात्र एखाद्या महिलेचे मंगळसूत्र चोरीला गेले असती महिला आनंदी कशी राहील? त्यामुळे सोनसाखळी चोरीच्या घटना होणार नाहीत याकडे सणांमध्ये विशेष लक्ष द्यावे लागते. वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी पोलीस कार्यरत असतात. दिवाळीत नागरिक गावी जातात. त्यामुळे घडफोड्या होऊ नये. यासाठी डोळ्यात तेल घालून बंदोबस्त ठेवावा लागतो. दिवाळी आनंदात सण. आम्ही खरंच नशीबवान आहेत की दिवाळीत वासियांना आनंदा बरोबर सुरक्षाही देतो कारण आमच्या पोलिसाच्या कुटुंबाची परिभाषा पूर्ण देश आणि देशवासीय.पोलीस असल्याचा आम्हाला गर्व आहे. जे देशवासीयांना आपले कुटुंब समजतो आणि त्याच्या सुरक्षितेसाठी ड्युटी करतो. वाशिम पोलीस स्टेशन मधील सर्वच अधिकारी व कर्मचारी यांच्यावतीने हार्दिक शुभेच्छा- पोलिस निरीक्षक रामेश्वर चव्हाण.

# हितवर्धक दिवाळी अंक: 2025 चा प्रकाशन सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी दादर**

वाचन संस्कृती ही कालबाह्य होत चालली आहे.कुणी तरी म्हटल आहे,की वाचाल तर वाचाल; कालबाह्य होत चालले आहे, वाचन संस्कृती टिकायला हवी. मोबाईलच्या मोबाईलच्या जमान्यात वाचक वर्गामध्ये कमालीचा उत्साह निर्माण व्हायला पाहिजे.त्यासोबत विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम सोबत इतर ज्ञान म्हणजे कथा, कविता संग्रह, कादम्बरीतील इतर ज्ञान घेणे सुद्धा प्राप्त अनिवार्य आहे. सोबत आपल्या हितवर्धक सामाजिक ग्रामीण संस्थेने केलेल्या कार्याचा आढावा व लेखक, कवी, कादंबरीकार यासाठी व्यासपीठ मिळावे. यासाठी पूर्वीचा काळ पाहिला तर ग्रंथालय संस्कृती होती व ऐन दिवाळीत ग्रंथालयात अनेक प्रकारचे दिवाळी अंक येत असत व वाचक तत्परतेने या दिवाळी अंकाची वाट पाहत असत.याच पाश्वभूमीवर हितवर्धक सामाजिक संस्थेच्या "हितवर्धक"या दिवाळी अंकाचा प्रकाशन सोहळा, दिवाळी अंक याचे प्रकाशन सामाजिक कार्यकर्ते श्री रवींद्र डंगर प्रमुख उपस्थिती सुयश क्लासेस आवरे चे अध्यक्ष श्रीनिवास गावड सर यांनी संस्थेचे तथा हितवर्धक दिवाळी अंकाचे संपादक श्री जी. एच.ठाकूर सर यांची प्रमुख उपस्थितीत दिवाळी अंकाचे प्रकाशन झाले या प्रसंगी एच.डी.टी.इंग्लिश स्कूलचे पहिली ते चौथी चे विद्यार्थी टीचर वर्ग व इतर उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन, श्रीफळ वाढवून आणि ईशस्तवन यांनी झाली. पाहुण्यांनी पाहुण्यांनीआपले मनोगत संपादकांची गोड भरून स्तुती केली आणि संपादकांनी स्वतः आपल्या अंकातील लेखांविषयी कविता विषयी माहिती दिली व अंक कसा श्रेष्ठ आहे?हे आपल्या मनोगत व्यक्त केले , सदर कार्यक्रम झाल्यावर जानकीबाई जनार्दन ठाकूर इंग्लिश मीडीयम स्कूल चे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय अशोक ठाकूर सर यांच्या पवित्र स्मृतीस श्रद्धांजली घेण्यात आली


कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री जी. एच. ठाकूर सर व आभार प्रदर्शन हे हेमांगी ठाकूर यांनी केले, कार्यक्रम प्रसंगी मनाली पाटील व अनुष्का वारी हे शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.



# इडा पिडा टळू दे बळीच राज्य येऊ दे...!'

**दैनिक युवक आधार...**

आपल्या महाराष्ट्रामध्ये बळीराजा हा शब्द शेतकऱ्यांच्या संदर्भामध्ये नेहमी वापरण्यात येतो. शेतकऱ्याला बळीराजा असे म्हंटले जाते. महाराष्ट्र आणि बळीराजा यांचं किती जिव्हाळ्याचं नातं आहे हे आपण ध्यानात घेतले पाहिजे. म्हणून बलिप्रतिपदेच्या निमित्त बळीराजा कोण होता ? कसा होता ? या विषयी थोडीशी माहिती घेऊया.




**पुराणकथा**

बळीराजाच्या संदर्भात महाभारत, भागवत आणि पद्मपुराण अशा विविध ठिकाणी कथा आढळते. पण गोष्ट अशी की प्रत्येक पुराणातील कथा वेगवेगळ्या आहेत. सर्वसामान्यपणे जी कथा सांगितली जाते ती अशी 'कार्तिक शुद्ध प्रतिपदेला बलिप्रतिपदा म्हणतात. त्या दिवशी बळी व त्याची पत्नी विंध्यावली यांची पूजा केली जाते. असुर (राक्षस) यांचा राजा बळी हा प्रल्हादाचा नातू आणि विरोचनाचा पुत्र होता. बळीराजा राक्षस कुळात जन्म घेऊनही चारित्र्यवान, विनयशील, प्रजादक्ष होता, दानशूरपणात खूप पुढे होता. त्याची शक्ती खूप वाढली होती. त्याने देव लोकांचा पराभव केला होता. मग विष्णूंनी वामनाचा अवतार घेऊन बळीराजाकडून तीन पावले दान घेतले आणि त्याला पाताळात घातले.' अशी पुराणात कथा आहे.

**बळीराजाचे राज्य का यावे वाटते ?**

पुराणांच्या कथानुसार बळीचे राज्य इतके चांगले होते की सर्व शेतकरी, रयत सुखी होती. राज्यातील सर्वजण अगदी सुंदर जीवन जगत होते. सुख, शांती, समृद्धी अशाप्रकारे बळीचे राज्य होते. राज्यांमधील जी संपत्ती होती त्याची त्याने न्यायपद्धतीने विभागणी केली होती. त्याला संविभागी राजा असंही म्हटलं जातं ते यामुळेच. जनता समाधानी असते, कोणावरही अन्याय होत नाही त्या राज्याला सुखी नाही तर काय म्हणावे? तसेच बळीच राज्य होते. त्यामुळे आजही बळीचे राज्य यावे ही शेतकऱ्यांची आणि सर्वसामान्यांची अपेक्षा असते.

**जगद्गुरू संत तुकाराम महाराज"**

"हरी तूं निष्ठुर निर्गुण ।
नाहीं माया बहु कठिण ।
नव्हे तें करिसी आन ।
कवणें नाहीं केलें तें ॥

बळी सर्वस्वें उदार ।
जेणें उभारिला कर ।
करूनि काहार ।
तो पाताळीं घातला ॥"

हरी तू निष्ठुर, कपटी आहेस. तुझ्यात चांगला गुण नाही. तुला थोडीही दया-माया नाही. दुशमणातील दुश्मन करणार नाही अशी कृत्ये तू केलीस. बळी सर्व दृष्टींनी चांगला, आदर्श किंवा उदार राजा होता. दान देण्यासाठी त्यांनी हात वर केला परंतु कपट करून त्याला तू पातळात घातलेस.

तुकयाबंधु कान्होबा

"बळीचा अन्याय सांग होता काय ? |
बुडवोनी तो पाय देऊनी माथा ||
कोंडीले दार हा काय कहार ? |
सांगतोसी चितर कथा ||"

**महात्मा फुले**

"सद्गुणी पुतळा राजा मूळ बळी |
दसरा दिवाळी आठविती ||
क्षेत्रीय भार्या ईडा पीडा जावो |
बळीराज्य येवो का बा म्हणती ?||"

**बळीच्या स्मृती**

आज महाराष्ट्रामध्ये बलिप्रतिपदेला म्हणजेच पाडव्याला बळीची पूजा केली जाते. गाई-म्हशींना, जनावरांना पूजले जाते. कारण बळी संस्कृतीमध्ये शेती, जनावरे यांचे महत्त्वाचे स्थान आहे. तसेच अनेकजण बळी, बळीराजा, बळीराम या नावाची माणसे गावागावात आढळून येतात. बीडपासुन जवळ असणाऱ्या 'वरवटी', 'आहेर वडगाव', कोल्हारवाडी या गावांमध्ये याचाच भाग म्हणून म्हशीच्या धावण्याची स्पर्धा आयोजित केली जाते, तसेच हल्ल्यांच्या टकरी लावल्या जातात. केरळ राज्यामध्ये 'ओणम' नावाचा सण बळीराजाचे आगमन म्हणून मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.

**आजचा बळीराजा**

बळीराजाला वामनाने पाताळात घातल्यापासून शेतकऱ्यांच्या डोक्यावर छत्र जणू हरपले की काय ? अशी स्थिती निर्माण झाली आहे. सरकारी आकडेवारीनुसार भारत देशामध्ये सर्वाधिक आत्महत्या शेतकरी करतो. आज शासन, प्रशासनामध्ये अनेक वामन तयार झाले असून शेतकऱ्यांचा बळी जात आहे. मंत्र्यांचे कारटे शेतकऱ्यांना चिरडून मारत आहेत. शेतकरी आंदोलनाची कोणी दखल घेत नाही. ही खरोखर खेदजनक बाब आहे. तरीही पुन्हा एकदा चांगल्या बळीच्या राज्याची कामना करून म्हणूया ...!

"इडा पिडा टळू दे 1 बळीच राज्य येऊ दे.....11"

ह.भ.प.श्रीकृष्ण महाराज उबाळे, बीड.

## कुरूळा गणातून पंचायत समिती उमेदवारी मिळावी सुरेश कोळगीर यांची मागणी

**दैनिक युवक आधार**

**कुरूळा प्रतिनिधी :प्रशांत ढवळे**

राज्यतील स्थानिक स्वराज्य संस्थाचे आरक्षण जाहीर झाले असून कुरूळा पंचायत समिती गण हा ओबीसी पुरुष साठी राखीव झाला आहे.राष्ट्रवादी अजितदादा पवार गटा कडून निवडणूक लढण्यासाठी सुरेश कोळगीर हे इच्छुक आहेत. ते गेली. दहा ते पंधरा वर्षा पासून सामाजिक कार्यात अग्रेसर आहेत.ते एकनिष्ठ कार्यकर्ते असून ते कंधार /लोहा मतदार संघाचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांचे विश्वासू आहेत. जनसामान्य माणसासाठी काम करणारे नेतृत्व म्हणून त्यांना ओळखले जाते.



त्यांनी मागील काळा मध्ये अनेक सामाजिक उपक्रम राबवले आहेत तालुका स्थर वरील शासकीय कामे या साठी त्यांनी अनेक वेळा पाठपुरावा केला आहे.सामान्य माणसाला आधार दिला आहे तसेच कुरूळा भागातील युवकामधील ओळखीचा चेहरा आहेत ह्या भागातील सर्व समाजातील जातीतील तळागाळातील जनते सोबत नाळ जोडून सामाजिक कार्य करत असतात त्यामुळे त्यांनी लोकप्रिय आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या कडे उमेदवारी ची मागनी केली आहे अशा व्यक्ती ला उमेदवारी मिळाली पाहिजे असे जनतेतून मागणी होत व संधी मिळाल्यास त्याचे सोने करू सर्व सामान्य माणसाला न्याय देण्याचे काम करू विकासा ला लक्ष करुन ह्या भागामध्ये काम करू असेही ते म्हणाले. यावेळी त्यांच्या सोबत असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## रेती माफीयाचा धारदार शस्त्राने खून

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे**

**कळंब:-** तालुक्यातील हद्दीत येत असलेल्या चिंचोली येथे सोमवारी २०ऑक्टोबर रात्री दहाच्या दरम्यान चिंचोली येथील आयबी बार समोर वर्धा जिल्ह्यातील अंदोरी येथील रेती माफिया रवि पारिसे नामक व्यक्तीचा चाकूने वार करून निर्गुण हत्या कळंब तालुक्यातील हद्दीत येत असलेल्या चिंचोली येथील आयबी बार समोर घडलेली आहे,रेतीच्या अवैध धंद्यातून अंतर्गत होणाऱ्या वादातून आणि चोरीचे टीप दिलेली या संशयाच्या वादातून हत्या झाल्याचे प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येते आहे,मिळालेल्या माहितीनुसार मृतक रवि पारिसे राहणार अंदोरी तालुका देवळी जिल्हा वर्धा यांनी देवळी तहसीलदार यांना रेती चोरीची माहितीची टीप दिली होती याच कारणामुळे संतप्त झालेल्या चोरट्यांनी काटा काढण्याचा फैसला घेतला होता कळंब हद्दीतील चिंचोली येथील आयबी बार समोर रवी पारिसे यांच्यावर धारदार शस्त्राने अनेक वार करण्यात आले यात रवि पारिसे याचा जागीच मृत्यू झाला या प्रकरणामध्ये आंजी येथील रोहन देशमुख,पंकज जवळे,सुनील तेलरांधे यांचा मारेकरी म्हणून सहभाग असल्याचं बोलले जात आहे



घटनेनंतर सर्व आरोपी घटनास्थळावरून पसार झाले,या घटनेतील एकेकाळी आरोपी असलेल्या रोहन देशमुख यांचे आणि देवळी तहसीलदार यांचे एकेकाळी घनिष्ठ संबंध होते अशी चर्चा आता या परिसरात रंगू लागले आहे,मृतक रवी पारिसे यांनी रेती चोरीचे टीप तहसीलदार यांना दिली यानंतर हा खून झाल्याचा या कथित घटनेचा आणि संबंधाचा काही धागा आहे का अशा दिशेने तपास होण्याची शक्यता वर्तविले जात आहे कळंब पोलीस आरोपीचा कसून शोध घेत असून, रेती माफिया यांची टोळी योद्धांनी या हत्यामुळे परिसरात तणाव निर्माण झाला असून कळंब पोलिस स्टेशन पुढील तपास करत आहे.

## हिंदी कवी आणि शायर यांचा कवी संमेलन 24 रोजी हिंदी मोर भवन येथे!

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी सतीश कडू**

निवडक हिंदीतील कवी आणि शायर यांचे कवी संमेलन 24 ऑक्टोबर रोजी, दुपारी दोन वाजता नटराज सभागृह, हिंदी मोर भवन, बर्डी, नागपूर येथे आयोजित करण्यात आलेले आहे. या संमेलनाची अध्यक्षता प्रसिद्ध हिंदी साहित्यिक डॉक्टर शिवनारायण आचार्य करीत आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून डॉक्टर सागर खादीवाला, माणिकरावजी खोब्रागडे, प्राध्यापक जावेद पाशा, शब्बीर अहमद विद्रोही, प्राध्यापिका हेमलता मिश्र मानवी, उपस्थित राहणार आहेत. या हिंदी काव्य संमेलनाचे उद्घाटन प्रसिद्ध कवित्री आणि शायरा नेहा गुडघाटे, मुंबई हे करणार आहेत. विशेष अतिथी म्हणून तन्हा नागपुरी. डॉक्टर भोला सरवर, वहीद हैरा, कवी जमील अन्सारी, उपस्थित राहणार आहेत.

आमंत्रित कवी अनिल मालोकर, अविनाश बागडे , श्रीमती माधुरी राऊलकर, श्रीमती पूनम हिंदुस्तानी, श्रीमती रूबी दास 'अरु", प्रा. हृदय चक्रधर, माननीय गजभिये, रजनी संबोधी, रोशनी गणवीर, कवी शिर्के, कवी सूर्यकांत मुनघाटे, प्रभू फुलझेले, डॉक्टर पोफळे, संजय गोडघाटे, अजहर हुसेन, शमशाद शाद, जमील अन्सारी, आतिश अहमद, अख्तर आलम, माहीर नागपुरी, खुर्शीद हैदर, शहीद हजरत, लोकमान अन्सारी, अकबर खैराबादी, रहेबर नागपुरी, जकवान अन्सारी, हिफजुरहमान खान नागपुरी, आजार हुसेन, शमशाद शहाद हे मान्यवर आपली रचना सादर करणार आहेत. या संमेलनाचे आयोजन नागपुरातील मूल्य संगर साहित्य विचार मंच, हिंदी साहित्य विकास संस्था, भारतीय मुस्लिम परिषद, फुले शाहू आंबेडकर विचार मंच, छवि पब्लिकेशंस यांनी केलेले आहे.

# दिवाळी पहाट उमरखेड आगारात...!

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी ज्योत्सना करवाडे**

आज दिनांक 22 ऑक्टोबर 2025 रोजी, उमरखेड आगारात दरवर्षीप्रमाणे यंदाही दिवाळी पाडव्याच्या पहाटेला एक आपुलकीचा, माणुसकीचा आणि स्नेहाचा कार्यक्रम सकाळी पाच वाजता यशस्वीरीत्या पार पडला.

दिवाळीच्या गोड आठवणी घरीच नाही, तर कामाच्या ठिकाणी सुद्धा अनुभवता याव्यात, या हेतूने बाहेरगावाहून मुक्कामी थांबलेल्या कर्मचारी बंधू-भगिनींसाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

**कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक पद्धतीने झाली.**

सर्व कर्मचाऱ्यांना उटणे लावून अभ्यंगस्नान घालण्यात आले

त्यानंतर औक्षण व ओवाळणी करून दिवाळीच्या शुभेच्छा देण्यात आल्या

गोड मिठाई आणि पारंपरिक फराळाचे प्रेमपूर्वक भोजन देण्यात आले



कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांना दिवाळी गिफ्ट देऊन सन्मानपूर्वक पुढील सेवेसाठी मार्गस्थ करण्यात आले

या उपक्रमात विशेष महत्त्वाचे ठरले ते ब्रह्मपुरी आगाराचे चालक-वाहक, जे सेवा बजावण्यासाठी उमरखेड येथे मुक्कामी होते. श्रीसुरेश भाऊराव ठवरे वाहक व आसिफ रशीद शेख चालक, त्यांचा औक्षण करून औक्षवंत करण्यात आला आणि आपल्या कुटुंबातील सदस्याप्रमाणेच त्यांना दिवाळी साजरी करून दिली गेली.

कार्यक्रमाचे संचालन आणि व्यवस्थापन आगार व्यवस्थापक मा.प्रमोदिनी किनाके मॅडम यांच्या नेतृत्वाखाली अत्यंत सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडले. त्यांनी स्वतः कर्मचाऱ्यांना औक्षण करून शुभेच्छा दिल्या व फराळाचे गिफ्ट वाटप केले.

किनाके मॅडम म्हणाल्या, "दिवाळी म्हणजे केवळ गोडधोड खाण्याचा सण नाही, तर एकमेकांप्रती प्रेम, सन्मान आणि आपुलकी व्यक्त करण्याचा सण आहे. कार्यालय हे आपले दुसरे घर आहे – ही भावना टिकवणं हेच खऱ्या अर्थाने नेतृत्व आहे."

सदर उपक्रमातून उमरखेड आगाराने पुन्हा एकदा कर्मचारी हीच खरी संपत्ती हे सिद्ध करत, कामाच्या ठिकाणीही सणाचा आनंद घरासारखा मिळू शकतो, हे दाखवून दिलं

## पनवेल शहर वाहतूक पोलिसांनी लॅपटॉप केला परत

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)**

पनवेल शहर वाहतूक शाखेतील पोलिसांना रस्त्यावर सापडलेला महागडा लॅपटॉप संबंधिताला परत करण्यात आला.

पोलिस हवालदार युवराज येळे, अमिर मुलाणी व राजपूत यांना शिव कॉम्प्लेक्स चौकी ते एचडीएफसी सर्कल येथे वाहतूक नियमन करीत असताना ॲपल कंपनीचा लॅपटॉप रस्त्यावर सापडला. या तिघांनी याबाबत वरिष्ठांना माहिती देऊन सोशल मीडियावर प्रसारित केली. त्यानुसार पनवेल तालुक्यातील पारगाव-दापोली येथील विनोद जितेकर यांनी संपर्क साधला. त्याबाबत खात्री झाल्यानंतर हा लॅपटॉप जितेकर यांच्या कुटुंबीयांकडे परत करण्यात आला आहे. याबद्दल पनवेल शहर वाहतूक शाखेचे कौतुक करण्यात येत आहे.



सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# डोंबिवलीत टिळकनगर विद्यामंदिरात दुर्गोत्सव सोहळा

## रायगडच्या कोर्लई किल्ल्याला मिळाला प्रथम क्रमांक

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

डोंबिवली, टिळकनगर विद्यामंदिरातील तब्बल ३५० विद्यार्थ्यांनी मेहनतीने महाराष्ट्रातील ३२ किल्ल्यांच्या प्रतिकृती उभारून दुर्गोत्सव साजरा केला, त्यात रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील ‘कोर्लई किल्ल्याने’ प्रथम क्रमांक पटकावला.गेल्या पंधरा दिवसांच्या काळात विद्यार्थ्यांनी दगड, माती आणि चिखलाचा वापर करून हे आकर्षक किल्ले उभारले आहेत. टिळकनगर शिक्षण प्रसारक मंडळ, शिक्षक आणि ट्रेक क्षितिज संस्थेच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच छत्रपती शिवाजी महाराजांच्या दुर्गबांधणीच्या परंपरेचा अनुभव




घेतला.या उपक्रमात पाचवी ते सातवी गटात कोर्लई किल्ला (सातवी ब) प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला.द्वितीय क्रमांक मंचना कांचना (६वी ब) व तृतीय क्रमांक पांडवगड (७वी ड) यांनी मिळवला.आठवी ते दहावी गटात दहावी ड चा सुरगड प्रथम, दहावी क चा भरतगड द्वितीय, तर आठवी ब चा भूषणगड तृतीय क्रमांकावर राहिला.महाविद्यालयीन गटात टिळकनगर कॉलेज ऑफ कॉमर्सच्या धर्मापुरी गडाने प्रथम क्रमांक पटकावला, तर सुमारगड (अकरावी कला) द्वितीय ठरला.

या उपक्रमासाठी शाळेने विद्यार्थ्यांना लागणारी माती, दगड, मेनकापड यासह सर्व साहित्य पुरवले.किल्ल्यांची रचना अधिक वास्तव वाटावी यासाठी ट्रेक क्षितिजच्या अमोल पोवळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मार्गदर्शन केले, तर परीक्षणाचे काम प्रिया कराडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.

टिळकनगर शाळेच्या आवारातील हे प्रदर्शन भाऊबिजेपर्यंत नागरिकांसाठी खुले असून, नागरिकांनी अवश्य भेट द्यावी, असे आवाहन टिळकनगर शिक्षण प्रसारक मंडळाने केले आहे.

# शांताराम चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे आदिवासी प्राथमिक शाळा साजे येथे फटाके व मिठाई वाटप




**रायगड (प्रमोद तरळ) :** माणगाव तालुक्यातील मौजे साजे गावातील जिल्हा परिषदेची आदिवासी प्राथमिक शाळा साजे येथे शांताराम चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने दीपावली सणाच्या निमित्ताने दि. १६ ऑक्टोबर २०२५ रोजी आदिवासी विद्यार्थिना ट्रस्टचे अध्यक्ष श्री. राजेश शांताराम मासवकर आणि ट्रस्टच्या खजिनदार सौ. संगीता राजेश मासवकर आणि यांच्या हस्ते फटाके आणि मिठाई वाटप करण्यात आले. शाळेचे शिक्षक श्री. वाबळे सर आणि सौ. कदम मॅडम यांनी शाळेला सुट्टी लागली असताना ही शाळेत विद्यार्थ्यांसह उपस्थित होते तसेच हा कार्यक्रम सुरळीत पार पडला याबद्दल त्यांचे ट्रस्टच्या वतीने शतशः आभार व्यक्त करून धन्यवाद देण्यात आले.

---

### श्री स्वामी समर्थांचे अध्यात्मिक विचार घराघरात पोहोचविण्याचे काम

# सा.रायगड मनोगतद्वारे होत आहे- मठाधिपती प.पू. गुरुवर्य श्री.श्री.108 महंत भाऊ सुधाकर घरत



**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

श्री स्वामी समर्थांचे अध्यात्मिक विचार घराघरात पोहोचविण्याचे काम गेल्या 21 वर्षापासून साप्ताहिक रायगड मनोगत हे दिवाळी अंकाद्वारे श्री स्वामी समर्थ अंक काढून करत असून ही एक अध्यात्मिक सेवा असल्याचे मत मठाधिपती प.पू.गुरुवर्य श्री. श्री.108 महंत भाऊ सुधाकर घरत यांनी आज पनवेल येथील गावदेवी पाडा मंदिराजवळील श्री स्वामी समर्थ मठात या अंकाच्या प्रकाशनावेळी केले.

यावेळी मठाधिपती प.पू.गुरुवर्य श्री. श्री.108 महंत भाऊ सुधाकर घरत यांच्यासह विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी बोलताना प्रितम म्हात्रे यांनी सुद्धा सातत्याने अध्यात्मिक विचार घेवून हा दिवाळी अंक प्रकाशित होत असून आज या अंकाचे प्रकाशन माझ्या हस्ते करताना मला परमानंद होत आहे व एक स्वामी सेवा असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी सा.रायगड मनोगतचे कार्यकारी संपादक संजय कदम, शिवसेना (उबाठा) पक्षाचे शहरप्रमुख प्रवीण जाधव, महिला आघाडी संघटीका अर्चना कुळकर्णी, मनसेचे संदीप पाटील, ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी, प्रशांत शेडगे, राकेश पितळे, सुमंत नलावडे, अनिल कुरघोडे, रवींद्र गायकवाड, प्रतिक वेदपाठक, हनिफ कच्छी, दिनेश गिल्डा,नानू वाघे, संजय जोशी, मेघना संजय कदम, रुचा कदम, मिरा सप्रे, रुतिका

# महिलाराजाचा झंकार — विंचूरच्या राजकारणात नव्या पहाटेची चाहूल !

## महिला उमेदवारांच्या झंकारामुळे पक्षांतर्गत मतभेद तीव्र

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

**विंचूर :**जिल्हा परिषद समिती गटात महिलांनी अभूतपूर्व झंकार निर्माण केला असून, पारंपारिक पुरुषसत्तेचा गड ढासळला आहे. अलका बाजीराव सालकाडे, योगिता गोपीनाथ ठुबे, सविता पांडुरंग राऊत, स्वाती ललित दरेकर, सोनिया सत्यजित होळकर, सुवर्णा ज्ञानेश्वर जगताप, किरण पंढरीनाथ थोरे, मंगल नरसिंह दरेकर आणि सोनाली सचिन दरेकर यांचा उल्लेख सर्वत्र होत आहे. या महिलांनी ठाम पाऊल टाकत आपले नेतृत्व दाखवले असून, स्थानिक राजकारणात नव्या पहाटेची चाहूल लागली आहे.

गेल्या काही वर्षांपासून जिल्हा परिषद समिती गटातील सत्ता काही मोजक्या पुरुष नेत्यांच्या हातात होती, मात्र या महिलांनी पारंपारिक समीकरणे मोडून नवी राजकीय दिशा दिली आहे. गावोगावी महिला उमेदवारांच्या नावांची चर्चा सुरू असून, “महिलांनी महिलांसाठी निर्णय घ्यावेत” असा आवाज अधिक बुलंद झाला आहे.

सामाजिक संघटनांपासून स्वयंसहायता गटांपर्यंत महिलांचे संघटन मजबूत झाले असून, त्यांनी स्थानिक विकास आणि निर्णय प्रक्रियेत सक्रिय भूमिका घेतली आहे. त्यांचा आत्मविश्वास, धाडस आणि जनसंपर्क यामुळे महिलांचे नेतृत्व स्थिरावू लागले आहे.

महिला नेतृत्वाच्या उदयानंतर स्थानिक पातळीवर पक्षीय समीकरणांत हलचाल जाणवू लागली आहे. काही ठिकाणी एकाच पक्षातील महिला नेत्यांमध्ये प्रतिष्ठेची लढत रंगण्याची शक्यता आहे. यामुळे पक्षांतर्गत मतभेद, गटबाजी आणि तिकिट वाटपात तणाव निर्माण होऊ शकतो, अशी चर्चा सुरू आहे. काही अनुभवी कार्यकर्त्यांनी नव्या लाटेला पाठिंबा दिला असला, तरी पारंपारिक नेत्यांमध्ये अस्वस्थता दिसून येत आहे.काही ठिकाणी नेतृत्वासाठी स्पर्धा रंगली असून दोन गट तयार झाले आहेत. काही ठिकाणी कौटुंबिक संघर्षही रंगला असून, महिला उमेदवारांच्या विरोधात घरातील पुरुष सदस्य उभे राहिले आहेत.

एकंदरीत, विंचूर जिल्हा परिषद समिती गटात ‘महिलाराज’ची लाट उमटली असून, स्थानिक राजकारण अधिक रंगतदार, तापलेले आणि उत्सुकतापूर्ण राहणार आहे.



---

### प्रबोधनकार भीम शाहीर प्रदीप कडबे यांना "

# कर्तव्यदक्ष आदर्श समाज प्रबोधनकार पुरस्कार -2025 लातूर येथे सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

**नागपूर :** महाराष्ट्र पोलीस मित्र शोषल असोशियन. ( महाराष्ट्र राज्य) वतीने मातृभूमीचे रक्षण करणे हे प्रत्येक भारतीयांचे प्रथम कर्तव्य आहे.गौरव कर्तव्याचा, सत्कार समाजसेवकाचा! राज्यस्तरीय पुरस्काराचे मानकरी सत्काराचा कार्यक्रम दिनांक-19 /10/2025 रोज रविवारला 12 ते 5 वाजेपर्यंत स्थळ- भालचंद्र ब्लड बँक, मध्यवर्ती बस स्थानकाच्या मागे, लातूर, येथे मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष- अण्णाराव पाटील ( विधिमंडळाचे अध्यक्ष ) यांच्या हस्ते उद्घाटन सोहळा पार पडला. प्रमुख पाहुणे म्हणून - लातूर जिल्ह्याचे लोकसभेचे खासदार - डॉ. शिवाजीराव काळगे, ज्येष्ठ पत्रकार - सुभाष घोडके, पत्रकार व्हाईस ऑफ मीडिया राजेंद्र बारगु डे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती अध्यक्ष सुशील चिकटे, सिद्धार्थ कवठेकर, कार्यक्रमाचे मुख्य संयोजक सुफी सय्यद शमशुद्दीन ( संस्थापक सचिव) प्रबोधनकार भीम शाहीर प्रदीप कडबे, उषा धावारे, इत्यादी मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलित करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात



आली. यावेळी नागपूर जिल्ह्यातील रामटेक तालुक्यातील किरणापूर येथील प्रबोधनकार भीम शाहीर प्रदीप बागवान कडबे यांनी क्रांतिकारी भीम गीत सादर केले. त्यांना सन्मानचिन्ह प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ ,शाल मानाचा फेटा " कर्तव्यदक्ष आदर्श समाज प्रबोधनकार पुरस्कार -2025 ने सन्मानित करण्यात आले. यावेळी महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायक - सदानंद मोरे अकोला, दीपमाला तुपकर, आर, बी, ढगे, सविता भारती, रंजना हासुरे, पूजा भोसले, बाळासाहेब मदाडे, डॉक्टर विकास निलंगेकर, डॉक्टर राम लिंग जावळे, विशाल शिंदे, डॉक्टर रामराव पवार, डॉक्टर बळीराम पवार, डॉक्टर शिवाजी गाडे, अजय पाटील, एडवोकेट गणेश कांबळे, दयानंद काळे, एडवोकेट लक्ष्मण शिंदे, कार्यक्रमाचे मुख्य संयोजक - सुफी सय्यद शमशुद्दीन, कार्यक्रमाचे संचालन प्रा. महादेव गपाट यांनी केले.

# पनवेलचा शिवाजी महाराज चौक दिपोत्सवानी उजळला

## भाजपच्या केदार भगत यांचा उपक्रम

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

दिवाळीचा पहिला दिवा छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरणी हे घोषवाक्य घेत पनवेलमधील छत्रपती शिवाजी महाराज चौक दिपोत्सवानी उजळला गेला. केदार भगत मित्र परिवाराच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, विरोधी पक्षनेते प्रितम जे.म्हात्रे, माजी स्थायी समिती सभापती मनोहर म्हात्रे, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, नगरसेवक अजय बहिरा,माजी नगरसेविका दर्शना भोईर, शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंजारराव, सरचिटणीस अमित ओझे,रूपेश नागवेकर, प्रभाकर बहिरा, प्रितम म्हात्रे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष आणि शिवकरचे सरपंच आनंद ढवळे,शहर मंडळाचे शेट्ये आदी उपस्थित होते.

पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याजवळ दरवर्षी केदार भगत हे दीपोत्सव साजरे करीत असतात. यंदाही त्यांनी हा उपक्रम साजरा केला. यावेळी मान्यवरांनी हजेरी लावली होती. या उप्रक्रमाविषयी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर हे म्हणाले की , डोळ्यांचं पारणं फेडणारी दिवाळी आपण ज्यांच्यामुळे साजरी करतो ते शिव छत्रपतींच्या चरणाजवळ दिवाळीचा पहिला दिवा लावण्याचा उपक्रम केदार भगत हे साजरा करत आहेत हे अभिमानास्पद आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याच्या सीमा ते गेल्यानंतरही मराठ्यांनी देशाच्या सीमा केल्या. त्यामुळे त्यांच्या कर्तृत्वाची आठवण,त्यांच्या धाडसाची आठवण आपण स्मरून तसेच पुढच्या पिढीला हा आनंद द्यावा यासाठी केदार भगत यांनी हा दीपोत्सव आयोजित केला.महाराजांचे आयुष्य पुढच्या अनेक पिढ्यांना प्रेरणादायी असल्याने असे कार्यक्रम निरंतर व्हावेत अशी इच्छा आ.ठाकूर यांनी शेवटी बोलून दाखवली.तर केदार भगत यांनी,आपण आधी एक दिवा आईसाठी,एक दिवा स्री साठी असे अनेक उपक्रम राबविले असल्याचे सांगून महाराजांबद्दल असलेला आदर व्यक्त करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले असल्याचे सांगितले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शेषनाथ गायकर, ब्रिजेश बहिरा, यज्ञेश पाटील, चेतन म्हस्कर,सुमित दसवते, फिरोझ शेख,योगेश साळवी, हर्षद गडगे,राजेंद्र भगत,नितेश भगत,रवी पारचे, संतोष वर्तले,चिन्मय भगत, जयदीप भगत, संकेत दसवते, अभिषेक भालेकर, मयूर पाटील,भावेश शिंदे, सचिन जाचक, सचिन भगत, जयेश भगत, मंगेश भगत,निहाल म्हात्रे, ध्रुव भगत गीतांजली भगत, संगीता पोतदार, निकिता पाटील, योगिता डांगरे, जिन्यासा भगत, सिमीन साळवी, अंकिता बहिरा, अवंती गडगे यांनी प्रयत्न केले.



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बोनस : सामाजिक न्यायाचा आर्थिक पाया

भारतीय समाजामध्ये सामाजिक न्याय हा केवळ राजकीय किंवा कायदेशीर अधिकारांचा प्रश्न नसून त्याच्या पाठीशी आर्थिक समता आणि कामगारांच्या श्रममानाचा अंक आहे. या अर्थाने, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अतिशय निर्णायक ठरते. त्यांनी सामाजिक अन्याय, जातीवाद व आर्थिक शोषण या त्रिसंयोजनाचा अभ्यास करून कामगार वर्गाचे हक्क आर्थिक व सामाजिक समतोलाने जाहीर करण्याचा प्रयत्न केला. त्यांचे श्रमहितधर्माचे तत्त्व, कामगार कल्याणाचे धोरण व 'बोनस' या संकल्पनेचा समाजशास्त्रीय अर्थ याचा जणू घनिष्ठ संबंध आहे, कारण बोनस हा फक्त आर्थिक लाभ नाही, तर श्रम मूल्यांचा, भागीदारीचा आणि सामाजिक प्रतिष्ठेचा प्रतिक आहे.





समाजशास्त्रात सामाजिक संस्थांमधील आर्थिक संस्थेचा अभ्यास करताना असे लक्षात येते की उत्पादन, वितरण व विनिमय यांच्या माध्यमातून सामाजिक संबंध स्थिर होतात किंवा बदलतात. एमिल दुर्खीम यांच्या मते, आर्थिक संस्था ह्या सामाजिक तथ्य आहेत, ज्याचा परिणाम सामाजिक जीवनावर होतो. याच धाटणीवर तात्विक दृष्ट्या पाहता, बोनस हे केवळ मेहनतीचा मोबदला नसून कामगार-मालक संबंध व सामाजिक समतेचा एक चक्रव्यूह आहे. कार्ल मार्क्स यांच्या श्रममूल्य सिद्धांताप्रमाणे उत्पादनात श्रमिकाचा सहभाग हे मूळ आहे; पण जर त्यांना योग्य वाटा मिळाले नाही, तर आर्थिक विषमता समाजशास्त्रीयदृष्ट्या वर्गसंघर्ष तयार करते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हे दृश्य भारताच्या संदर्भात ओळखले व बोनसच्या माध्यमातून कामगारांना न्याय मिळावा हे सुनिश्चित करण्याचा प्रयत्न केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगार चळवळीची दिशादर्शक भूमिका घेतली. १९३६ मध्ये त्यांनी Independent Labour Party स्थापन केली, ज्यात त्यांनी मजुर वर्गाचे सामाजिक व आर्थिक हितकर्ते म्हणून भूमिका स्वीकारली. या पक्षाच्या घोषणापत्रात त्यांनी बोनस, पेन्शन व निवृत्ती लाभ यांचा समावेश केला होता. त्यांनी संयुक्त विद्रोहाच्या मार्गाने आर्थिक व सामाजिक न्यायासाठी कामगार संघटनांची गरज अधोरेखित केली. १९४२ ते १९४६ या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे उपाधिनियुक्त कामगार मंत्री म्हणून 'इंट्रीम व्हायसरॉय' सल्लागार मंडळात काम करत होते. या काळात त्यांनी कामाचे तास कमी करणे, सुट्या देणे, कामगारांसाठी विमा व सामाजिक सुरक्षा यांसारख्या नव्या कायद्यांची मांडणी केली.

बोनससंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धोरण हे सहभाग, वाटा आणि न्याय या तिन्ही घटकांवर उभे आहे. ते म्हणतात की उद्योगातील नफा हा केवळ भांडवलदाराचा नाही; तो मजुरांच्या श्रमाचा परिणाम आहे. श्रमिकाला योग्य बोनस मिळत असेल, तर तो व्यवसायाला व समाजाला समर्पित होतो आणि औद्योगिक शांतता व सामाजिक समानता वृद्धिंगत होतात. त्यामुळे बोनस हे एक सामाजिक नियंत्रणाचा आणि सामाजिक एकतेचा घटक बनते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वेळीच हे सांगितले की मजूर हे 'सामान्य वस्तू' नसून उत्पादन प्रक्रियेत मानवी घटक आहेत, आणि त्यांच्या कामाचं सामाजिक मूल्य आहे.

भारतीय संविधानाला कामगारांच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने पाहिल्यास, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्या संरचनेमध्ये 'सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय' हे तत्त्व समाविष्ट केले. संविधानातील निर्देशात्मक तत्त्वाधिकार (Directive Principles of State Policy) अंतर्गत कलम ४३ मध्ये 'मानवी गरजेची जीवनशैली' व "योग्य उत्पन्न" यांशिवाय कामगारांसाठी योग्य वेतन व सुयोग्य जीवनमान देण्याची राज्याची जबाबदारी सांगितली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बोनसविषयक विचार या तत्त्वाशी सुसंगत आहेत कारण ते म्हणतात की कामगाराला फक्त रोजगार मिळावा एवढे पुरेसे नाही, तर त्यांना त्या रोजगारातून योग्य वाटा मिळावा, ज्यातून त्यांचा सामाजिक दर्जा उंचावला जावा.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, बोनस हे वितरक न्याय (distributive justice) आणि आर्थिक समता (economic integration) या संकल्पनांचा प्रत्यक्ष आधार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय सामाजिक रचनेतील जातीवाद आणि वर्गवाद यांना एकत्र पाहिले आणि सांगितले की आर्थिक विषमता ही सामाजिक विषमतेची मूळ आहे. त्या दृष्टिने बोनसची संकल्पना श्रमिकांना उत्पादन प्रक्रियेत 'भागीदार' म्हणून स्वीकारण्याचा एक मार्ग आहे. भागीदारीमुळे सामाजिक प्रतिष्ठा वाढते आणि उत्पादन संबंधांमधील विसंगती कमी होते. आजच्या जागतिकीकरण व आधुनिकीकरणाच्या काळात जेव्हा कामगार हक्कांवर प्रश्न निर्माण होत आहेत, तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा बोनसविचार अधिकच समर्पक ठरतो. उद्योगसम्बंधी कायदे आणि कामगार कल्याणाच्या मोहिमांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कायद्याचा आधार दिला; त्यांनी कामगारांच्या संघटनांना मान्यता दिली, कामाच्या वेळा मर्यादित केल्या, कामगार विमा व कल्याण यांच्या सूत्रावर काम केले.

बोनस किंवा उत्पादनातील नफ्याचा कामगारांसाठी योग्य वाटा हा त्यांचा सामाजिक व आर्थिक दर्शनाचा अविभाज्य भाग होता. आजही जेव्हा बोनस कायदा किंवा कामगार हक्क चर्चा मध्ये येतात, तेव्हा त्यांच्या विचारांची अनिवार्य आठवण येते. अशी आर्थिक सामाजिक समता कार्यान्वित झाल्यास औद्योगिकसमाजातसामाजिकएकात्मता व स्थैर्य वाढतात हे समाजशास्त्रज्ञांनीही मानले आहे. त्याअर्थाने, 'उद्योगशासन' व 'उत्पादन संबंध' या घटकांमध्ये कामगारांचा सहभाग जितका जास्त असेल, तितकी सामाजिक समानता वाढेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बोनसदृष्टिकोनात हे स्पष्ट दिसते. त्याचबरोबर, कामगारांना श्रममूल्याची योग्य किंमत न मिळाल्यास त्यांच्या जीवनरक्षक गरजा पूर्ण होत नसतील तर त्यामुळे सामाजिक न्यायाचा पाया हलू शकतो.

समाधानकारक ध्येय हे केवळ बोनस देऊन पूर्ण होत नाही; त्याचबरोबर कामगारांचे स्थायी कल्याण, सुरक्षीत कामाची अट, आरोग्यसुविधा, निवृत्ती वेतन योजना आणि सामाजिक सहभाग या सर्व बाबी जोडणे गरजेच्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले होते की कामगारांनी केवळ वेतन व बोनसपुरते स्वतःची मागणी मर्यादित ठेवू नये; त्यांना आर्थिक व राजकीय निर्णयप्रक्रियेत भाग घेण्याचीही गरज आहे. समाजात 'सामाजिक एकात्मताही' महत्वाची आहे. दुर्खीम यांच्या मते, सेंद्रिय एकात्मता म्हणजे आधुनिक औद्योगिक समाजात विविध घटकांमधील संबंधाचा आधार आहे. या दृष्टीने बोनससारख्या यंत्रणांनी कामगार व मालक यांच्या संबंधात एक प्रकारचा गुंतवणूक भागीदारत्व निर्माण केले जाते, ज्यामुळे परस्पर अवलंबित्व व सहयोग वाढतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कामगारहितधर्मातून हे प्रत्यक्ष दिसते. त्याचबरोबर, त्यांचा अर्थशास्त्रीय दृष्टिकोन असा होता की विकासाचा लाभ सर्वांना पोहोचला पाहिजे, मात्र ते लाभ भांडवलदार किंवा काही उद्योगगटांना घेऊ न देता त्यात कामगारांचा योग्य वाटा सुनिश्चित करणे आवश्यक आहे.

म्हणूनच आपण आज "डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बोनस : सामाजिक न्यायाचा आर्थिक पाया" हे विषय घेताना, बघतो की बोनस ही संकल्पना आजही फक्त उद्योगातील आर्थिक व्यवहारापुरती मर्यादित नाही, तर ती सामाजिक बदल, श्रमिक सन्मान व मानवी प्रतिष्ठेची विषयवस्तू आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांचे विचार श्रमिकांना आर्थिक सक्रिय भागीदार बनवणे, उत्पादन प्रक्रियेत त्यांना स्थान देणे आणि समाजातील विषमता दूर करणे या ध्येयाने मांडले. भारतीय समाजात सामाजिक न्यायाचे व आर्थिक समतेचे स्वप्न आजही त्यांच्या या विचारांच्या बळावर पुढे चालू आहे.या लेखातून असे स्पष्ट होते की कामगारांना बोनस मिळणे हे फक्त आर्थिक प्रोत्साहन नसून समाजशास्त्रीय संकल्पना आहे, ज्यामध्ये श्रमस्वीकृती, सामाजिक कदर, आर्थिक समता आणि औद्योगिक शांतता यांचा संगम आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी या तत्त्वाचा अभ्यास करून त्याची व्यावहारिक रूपरेषा आखली. आजच्या बदलत्या काळात, जिथे कामगारांच्या हक्कांविषयी प्रश्न निर्माण होत आहेत, त्यांच्या या विचारांचे पुनरावलोकन अधिकच आवश्यक ठरले आहे.

**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**

## जनसेवेचा दीपस्तंभ: मा. श्री. जयसिंगरावजी पाटील बापू

मा. श्री. जयसिंगरावजी पाटील बापू (उंडाळकर) यांचे जीवन म्हणजे जनसेवा, न्याय आणि ग्रामीण विकासाचा एक प्रेरणादायी अध्याय होता.

९५ वर्षांचे त्यांचे खडखडीत आयुष्य हे केवळ दीर्घायुष्य नव्हते, तर ते समाजासाठी समर्पित केलेल्या कार्याची साक्ष होती.

**ग्रामीण विकासाचा वसा आणि वारसा**

कराड दक्षिण भागातील दरीखोऱ्यांमध्ये राहणाऱ्या गोरगरीब जनतेची सेवा करण्याचे व्रत बापूंनी घेतले. या उदात्त हेतूनेच त्यांनी ग्रामीण विकास शिक्षण संस्थेची स्थापना करण्यासाठी प्रयत्नशील राहिले व ग्रामीण विकास शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदाची धुरा समर्थपणे अनेक वर्षे सांभाळली.



मा.जयसिंगराव बाळकृष्ण पाटील (बापू)

प्रसाद डिजीटल,उंडाळे

समाजातील वंचित घटकांना शिक्षण आणि विकासाच्या प्रवाहात आणणे हे त्यांचे मुख्य ध्येय होते. एवढेच नव्हे, तर येथील तरुणांना रोजगार मिळावा यासाठी त्यांनी रयत सहकारी साखर कारखाना उभा करण्यासाठी अहोरात्र कष्ट घेतले . साखर उद्योगापासून ते शेतीमध्ये कोणत्या हंगामात कोणते पीक घ्यावे, इथपर्यंत त्यांचे ज्ञान परिपूर्ण होते. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी चालते बोलते कृषी विद्यापीठ बापू होते गावातल्या पीक पाण्याचा खडाणखडा लेखाजोखा त्यांच्याकडे असायचं कृषी मार्गदर्शक ते दलित मित्र म्हणून त्यांच्या नावाची ख्याती सर्वत्र होती.

लिबर्टी मजदूर संघाचे कार्य करण्यापर्यंतची त्यांची उत्तुंग भरारी त्यांच्या अष्टपैलू नेतृत्त्वाची ओळख करून देते.

**लोकन्यायालयाचे न्यायाधीश आणि गरिबांचा देव**

बापूंचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची न्यायप्रियता आणि सामान्यांसाठीची तळमळ. स्वातंत्र्यानंतर त्यांनी उंडाळे गावचे पहिले सरपंच म्हणून अनेक वर्षे गावचा विकास साधला. त्यांच्या कार्यकाळात, गावच्या मुख्य चौकात सकाळी १० ते १२ आणि सायंकाळी समोरचे प्रश्न संपेपर्यंत जनतेचे लोकन्यायालय भरत असे आणि त्याचे न्यायाधीश स्वतः बापू असायचे.

त्यांचा ग्रामीण भागाचा शब्द व्यवहार आणि सडेतोडपणा यामुळे तंटे पोलिस स्टेशन किंवा कोर्टाच्या पायरीपर्यंत कधी पोहोचलेच नाहीत.

मुरब्बी विचारांनी ते परखडपणे गरिबाला न्याय मिळवून देत असत. म्हणूनच, कोर्टाची पायरी न चढू देता, जागेवर न्याय मिळवून देणारा देव म्हणून लोक बापूंना मानत होते. त्यांनी ग्रामीण भागाची नाडी अचूक ओळखली होती.

**नेतृत्त्वाची कठोरता आणि ममतेचा परिस्पर्श**

बापूंचे शिक्षण केवळ माध्यमिक असले तरी, समाजातील व्यवस्थेबाबतचे त्यांचे ज्ञान कोणत्याही उच्च शिक्षणाइतकेच परिपूर्ण होते. त्यांचे जीवन म्हणजे जगण्यातील रग आणि वागण्यातील कठोरपणा यांचा संगम होता. पण या कठोरपणातही एक वेगळी ममता होती:

प्रत्येक माणसाला नाव घेऊन बोलवणे आणि त्याच्या कुटुंबाची आस्थेवायकपणे चौकशी करणे, ही त्यांची सवय होती.

सर्व समाजातील तळागाळातील लोकांच्या सुखदुःखाशी ते समरस होत असत. त्यांच्या या परिस्पर्शाने अनेकांच्या जीवनाची सोने झाले.

उंडाळकर घराणे हे स्वातंत्र्य चळवळीतील एक कुटुंब. हा वसा आणि वारसा बापूंनी आपल्या कार्यातून अनेक वर्षे जपला. त्यांच्यामुळेच उंडाळे गावाचे नाव जगभर झाले.

**पडद्यामागील नीति-तज्ञ राजकारणी**

माजी सहकार मंत्री विलासराव पाटील उंडाळकर काका यांचे ज्येष्ठ बंधू असलेले बापू, हे राजकारणात पडद्यासमोर न येता, पडद्यामागील राजकारण करण्यात नीति-तज्ञ होते. आपल्या बंधूला मोठे करण्यासाठी त्यांनी केलेले मार्गदर्शन आणि दिलेले पाठबळ हे राजकीय नीतिमत्तेचे उत्तम उदाहरण होते.

**एक युगपुरुष हरपला**

बापूंच्या जाण्याने आज उंडाळे पंचक्रोशीतील सामान्य माणूस दुःखाच्या छायेत आहे.

प्रत्येकाला आपला वडीलधारा, शहाणपण सांगणारा, कुटुंबातला माणूस हरवल्याची भावना आहे. आज ते देहाने जरी आपल्यात नसले तरी, त्यांच्या महान आठवणींच्या रूपाने ते आमच्या हृदयात अढळ स्थान निर्माण करतील.

अशा या युगपुरुषाला आमची भावपूर्ण श्रद्धांजली !

## ट्रॉफीवरून खडाजंगी सुरूच! श्रीलंका, अफगाणिस्तानचा भारताला पाठिंबा; नक्वी मात्र निर्णयावर ठाम

**नवी दिल्ली :** भारताने आशिया चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेचे जेतेपद मिळवून जवळपास महिना उलटला, तरीही या स्पर्धेतील ट्रॉफीवरून सुरू असलेला राडा अद्याप सुरूच आहे. मंगळवारी श्रीलंका आणि अफगाणिस्तान क्रिकेट मंडळांनी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाला (बीसीसीआय) पाठिंबा दर्शवला. मात्र आशियाई क्रिकेट परिषदेचे (एसीसी) अध्यक्ष मोहसीन नक्वी त्यांच्या हस्तेच भारताला ट्रॉफी देण्यावर ठाम आहेत.

सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वात खेळणाऱ्या भारतीय संघाने २८ सप्टेंबर रोजी आशिया चषकाच्या अंतिम फेरीत पाकिस्तानला ५ गडी राखून पराभूत केले. भारताने एकंदर नवव्यांदा ही स्पर्धा जिंकली. मात्र भारताच्या विजयापेक्षा त्यानंतर झालेल्या नाट्यमय घडामोडींची सगळीकडे अधिक चर्चा सुरू आहे. भारताने स्पर्धा जिंकल्यानंतर नक्वी यांच्याकडून चषक स्वीकारण्यास मनाई केली. नक्वी हे पाकिस्तानचे मंत्री असून तेच पाकिस्तान क्रिकेट मंडळाचे (पीसीबी) अध्यक्षही आहेत.





आशिया चषक विजेत्या भारतीय संघाला ट्रॉफी न दिल्यामुळे बीसीसीआयने नाराजी व्यक्त करताना नक्वी यांच्याविरोधात तक्रार केली आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (आयसीसी) नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या बैठकीत अध्यक्ष जय शहा यांच्यापुढे बीसीसीआय हे प्रकरण मांडणार असल्याचे समजते. अफगाणिस्तान व श्रीलंकन क्रिकेट मंडळाने बीसीसीआयला पाठिंबा देताना त्यांना ट्रॉफी देण्यात यावी, असे मत नोंदवले आहे. मात्र नक्वी हे दुबईतच स्वहस्ते ट्रॉफी देऊ, यावर ठाम आहेत.

"बीसीसीआयचे सचिव देवाजित सैकिया, उपाध्यक्ष राजीव शुक्ला व आशियाई क्रिकेट परिषदेचे सदस्य असलेल्या श्रीलंका व अफगाणिस्तान क्रिकेट मंडळांनी गेल्या आठवड्यात एसीसीला पत्र लिहिले आहे. यामध्ये ट्रॉफी भारताला लवकर देण्यात यावी, असे नमूद करण्यात आले होते. मात्र यावर नक्वी यांनी नकारात्मक प्रतिसाद दिला आहे. बीसीसीआयच्या सदस्याने दुबईत येऊन ट्रॉफी स्वीकारावी, अशी नक्वी यांची मागणी आहे," असे बीसीसीआयच्या एका पदाधिकाऱ्याने सांगितले. बीसीसीआयने असे कृत्य करण्यास नकार दिला आहे.

एसीसीने बीसीसीआयला दिलेल्या प्रत्युत्तरात त्यांनी भारतीय संघाच्या कृतीवर टीका केली आहे. अंतिम सामना झाल्यानंतर पारितोषिक वितरणाच्या वेळी भारतीय संघाने आपण नक्वी यांच्या हस्ते ट्रॉफी स्वीकारणार नाही, असे सांगितले. त्यामुळे जवळपास ४० मिनिटे मंचावरील अतिथींचा खोळंबा झाला. भारतीय संघाने हे कृत्य टाळायला हवे होते, असेही एसीसीने मांडले आहे. त्यामुळे एकूणच हे प्रकरण आणखी काही काळ रंगणार आहे.

क्रिकेटच्या इतिहासात प्रथमच एखाद्या विजेत्या संघाला चषक देण्यात आलेला नाही, असे मला वाटते. ही फारच अनाकलनीय गोष्ट असली, तरी माझ्यासाठी माझ्या संघाचा विजय, हीच खरी ट्रॉफी आहे, असे मत भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादवने व्यक्त केले होते.

मे महिन्यात पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात भारताच्या २६ जणांचा बळी गेला. त्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूरद्वारे प्रत्युत्तर दिले. मात्र तेव्हापासून भारताचे पाकिस्तानशी संबंध आणखी बिघडले. उभय संघ फक्त आयसीसी स्पर्धांमध्येच आमनेसामने येतात. त्यातही दोन्ही देश एकमेकांच्या देशात खेळण्यासाठी जात नाहीत.

**वादाची पार्श्वभूमी**

संपूर्ण आशिया चषक स्पर्धेत भारत-पाकिस्तान ३ वेळा आमनेसामने आले. तिन्ही लढतींमध्ये भारताने पाकिस्तानच्या खेळाडूंशी हस्तांदोलन करणे टाळले. तसेच अंतिम सामन्यानंतर भारताने पाकिस्तानी मंत्र्यांच्या हातून चषकही स्वीकारला नाही. नक्वी बराच काळ मंचावर ताटकळत होते. त्यावेळी पाकिस्तानचा संघही मैदानात नव्हता, तर भारताचे खेळाडू मात्र मैदानातच बसून होते. अखेरीस एका तासाने पारितोषिक वितरण सोहळा सुरू झाला.

भारताने वैयक्तिक पुरस्कार अन्य पदाधिकाऱ्यांच्या हातून घेतली. मात्र जेतेपदाचा चषक आपणच देणार, यावर नक्वी ठाम होते.

शेवटी नक्वी अन्य कुणाच्या हातून भारताला चषक देण्यास तयार झाले नाही व ते चषक घेऊनच माघारी परतले. त्यामुळे भारताने स्वतःच चषकाच्या आभासी प्रतिकृतीसह जल्लोष केला.

# कामोठे शहरात भीषण आग - दोन महिलांचा मृत्यू;

## वंचित बहुजन आघाडीची मागणी "कामोठे शहरात तात्काळ अग्निशमन केंद्र उभारावे"

**दैनिक युवक आधार**
**खांदा कॉलनी प्रतिनिधी**

दिनांक 21 ऑक्टोबर रोजी पहाटेच्या सुमारास कामोठे शहरातील सेक्टर 36 मधील अंबे श्रद्धा सोसायटी येथे भीषण आग लागून रूम नं. 301 पूर्णतः जळून खाक झाला. या भीषण आगीत रेखा सिसोदिया आणि पायल सिसोदिया या दोघींचा दुर्दैवी मृत्यू झाला असून परिसरात शोककळा पसरली आहे.






या घटनेची माहिती मिळताच वंचित बहुजन आघाडी पनवेल महानगर अध्यक्ष आयु. आनंद गायकवाड यांच्या सूचनेनुसार पनवेल महानगर कमिटी आणि कामोठे शहर अध्यक्ष आयु. महेंद्र असुरडेकर यांच्या उपस्थितीत संपूर्ण कमिटीने घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली व नागरिकांशी संवाद साधला.

नागरिकांनी सांगितले की, पनवेल महानगरपालिका अग्निशमन विभागाच्या 4 गाड्या घटनास्थळी पोहोचल्या होत्या, मात्र केवळ एकच गाडी व्यवस्थित कार्यरत होती. उर्वरित गाड्यांमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने आग विझवण्यात विलंब झाला.

**वंचित बहुजन आघाडीची ठाम मागणी:**

"कामोठे शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे येथील सुरक्षेसाठी स्वतंत्र अग्निशमन केंद्र उभारणे अत्यावश्यक आहे. जर पनवेल महानगरपालिकेने या घटनेची गंभीर दखल घेऊन तातडीने कामोठे येथे अग्निशमन केंद्र उभारले नाही, तर आम्ही तीव्र आंदोलन छेडू."

या घटनेमुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण असून, प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करत आहोत.

यावेळी पनवेल महानगर उपाध्यक्ष आयु. शशिकांत कळवेकर, आयु. सतीश अहिरे, महासचिव आयु. अविनाश अडागळे, प्रसिद्धी प्रमुख आयु. राहुल चव्हाण, कामोठे शहराचे अध्यक्ष आयु. महेंद्र असुरडेकर, सचिव सचिन गायकवाड, सुखदेव लोखंडे, गौतम धुरंधर, आकाश जाधव आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

### बबन बारगजे यांच्या वतीने बनवलेल्या सुगंधी उटण्याचे

# लोकनेते रामशेठ ठाकूर व आ. प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते प्रकाशन



**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

भाजपाचे निष्ठावंत कार्यकर्ते व भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे यांच्या वतीने कळंबोलीतील प्रभाग आठ मध्ये सुगंधी उटण्याचे वाटप करण्यात आले. या उटण्याच्या पाकिटाचे प्रकाशन लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले

दिपवाळी मधील पहिला दिवस अभ्यंग स्नानाचा असतो व त्यादिवशी व नंतर दोन दिवस समाजामध्ये उटणे लावून आंघोळ करण्याची प्रथा आहे . आणि हा सण गोड व्हावा म्हणून बबन बारगजे यांनी त्यांच्या प्रभाग आठ मधील जनतेला उटणे वाटप केले . प्रकाशनाच्या वेळी रामशेठ ठाकूर यांनी सांगितले की बबन बारगजे हे पहिल्यापासून भाजपाचे काम करीत आहेत व त्यांच्या कामाच्या जोरावर त्यांना भटके विमुक्त आघाडीच्या उत्तर रायगड जिल्हा अध्यक्षपदी प्रमोशन दिलेले आहे व ते संपूर्ण जिल्हाभर चांगले काम करीत आहेत. मी त्यांना व त्यांच्या परिवारांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा देतो व त्यांच्या हातून अशीच समाजाची सेवा घडत राहावी अशी अपेक्षा व्यक्त करतो. यावेळी त्यांच्यासोबत प्रभाग आठचे अध्यक्ष प्रकाश शेलार आध्यात्मिक आघाडीचे मंडळ अध्यक्ष लक्ष्मण जायभाय युवा कार्यकर्ते महेश बारगजे, विजय जायभाय, शुभम गवस इ कार्यकर्ते सोबत होते .

एक मेका सहाय्य करु
अवघे धरु सुपंथ...!

कामोठे रहिवासी सामाजिक सेवा संस्था,
ओम शिव शंकर सेवा मंडळ, कामोठे व जय हरि महिला मंडळ, कामोठे

एक हात मदतीचा...!

देणगीदार व अन्नदात्यांचे
खुप-खुप आभार

ओम शंकर सेवा मंडळ २५००० रु.
विठ्ठल रुक्मिणी महिला भजनी मंडळ
युनिक ॲटो
श्री बजरंग ट्रेडर्स
श्री कृष्णा एन्टरप्रायजेस
सागर कन्हैय्या डेरी
राधा साडी
कारभारीन मिसळ
अंबिका किराणा
कलाश्री साडी
प्रिन्स वर्ल्ड
माहेर साडी
राधीका साडी
रिअल चॉईस
सिध्दनाथ ज्वेलर्स
संभाजी डेअरी
विघ्नहर्ता सुपर मार्केट
तुलसी ज्वेलर्स
निलकंठ स्विट्स
महाविर ज्वेलर्स
वाल्मीकी समाज कामोठे
ओमकार कलेक्शन
मिनाक्षी ज्वेलर्स
मिनाक्षी गोल्ड
सायली कलेक्शन
शंकर किरणा स्टोअर्स
शिवज्योती सोसायटी

डॉ.हेमंत पाटील
डॉ.चारुशिला पाटील
श्री.सचिन गोडसे
श्री.अमोल सैद
सौ.सिमाताई गुंजाळ
श्री.नितीन कवडे
डॉ.निलेश खरात
श्री.किसन रसाळ
श्री.काशिराम ह मोरे
सौ.प्रितीताई खिलारी
सौ.मनीषा सावली
सौ.प्रिया जाधव
सौ.कविता खिलारी
सौ.शितल कुमार
सौ.लताताई बुगदे
सौ.ताई भोसले
सौ.मनीषाताई बिडे
सौ.अनिता अनफट
श्री.मधुकर घरत
श्री.आबा पावडे
श्री.चव्हाण साहेब
सोनु. मॅचिग. सेंटर
सौ.कल्पना भोर
सौ.शुभांगी कड

श्री.देवानंद भाटे सर
श्री.मंगेश आढाव
श्री.बाळासाहेब गाजरे
श्री.संदिप इथापे
श्री.कमलेश चौधरी
श्री.सेजाथ पडदेवाला
श्री.शरद चव्हाण
श्री.अशोक पुरोहित
सौ.वैशाली जाधव
सौ.मंगल आवारी
सौ.आभा सिंग
सौ.मनीषा खरजे
श्री.अतुल हडवळे
श्री.मनीष भोसले
श्री.दिनेश माने
श्री.संदेश देवरे
श्री.सागर शिर्के
सौ.उर्मिला पवार
सौ.विजयलक्ष्मी गुजर
सौ.मनीषाताई बिडे
श्री.धनंजयशेठ निमसे
श्री दुबल शेठ
सौ.गिताताई उंडे

जुही गार्डन सोसायटी
सौ.सुप्रिया माने
सौ.वैशाली साळुंखे
सौ.गायत्री सिंग
सौ.प्रज्ञा रावराणे
सौ.ऋतू पाटील
सौ. रेवती सिंग
सौ.वैशाली बेलवलकर
सौ.सुधा शेट्टी
सौ.वारीजा गवडा
सौ.संध्या खोत,
सौ.सुवर्ण देसाई
सौ.अंजना खरजे
सौ.माधवी गाडगे
सौ.साधना गायकवाड
सौ.इंदिरा अताडकर
सौ.प्राजक्ता भोसले
सौ.विशाखा शेडंगे
सौ.रसिका तावडे
सौ.शैला वराडकर
सौ.सुनंदा दळवी

सौ.गिता सिंग
श्री.अमित सावंत
श्री.संजय प्रसाद
सौ.प्रीतीताई खिलारी
सौ.लताताई बुगदे
श्री मारुती गाडगे
सौ.प्रीतीताई खिलारी
सौ.कांजलकर शिवडी
सौ.ताई भोसले
सौ.शालनताई सत्रे
सौ.सविता शिंदे
सौ.रोमि अवस्थी
सौ.प्रज्ञा पाटील
डॉ.स्वलेषा शेख
सौ.ऐश्वर्या शिवडी
सौ.सीता गावडे
सौ.सायली मोहिते
सौ.अमिता
सरोदे आजी
वाघमारे



# कोयाळी येथील प्रा.डॉ. आत्माराम वानखडे सर तसेच आदर्श शिक्षक श्री. विठ्ठल भिसडे सर यांचा भव्य सत्कार

**दैनिक युवक आधार**
**वाशिम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे**

**वाशिम :** आज दीपावली सनाच्या शुभ महूर्तावर ग्रामस्थ मंडळी कोयाळी( बु )यांनी English विषयामध्ये गावात प्रथमच PHD पदवी संपादन केल्या बद्दल श्री.आत्माराम वानखडे सर तसेच गावातील युवकांचे मार्गदर्शक आदर्श जिल्हा परिषद शिक्षक.श्री. विठ्ठल भिसडे सर यांचा भव्य सत्कार करण्यात आला, महापुरुषांच्या मूर्तीपूजनाने कार्यक्रमास सुरुवात झाली, यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.किशोर वानखडे यांनी केले तर,प्रास्ताविक मनोगत शिवव्याख्याते गोपाल भिसडे यांनी केले,सत्कारमूर्ती श्री. आत्माराम वानखडे,तसेच आदर्श जिल्हा परिषद शिक्षक श्री.विठ्ठल भिसडे सर यांनी गावातील तरुणांना अत्यंत महत्वाचे मार्गदर्शन केले,यावेळी आत्माराम वानखडे सर,तसेच विठ्ठल भिसडे सर यांचा दोन्हीही सत्कार मूर्तीचा सत्कार गावातील मंडळींनी सामूहिक रित्या केला, यावेळी माजी पं.स.सदस्य परसराम वानखडे,दिलीप वानखडे,भुजंगा वानखडे,किशोर वानखडे,सुमेध वानखडे, सचिन वानखडे,शिवव्याख्याते गोपाल भिसडे,वैभव वानखडे,शयाम वानखडे,सिताराम वानखडे यांच्या सह गावातील महिला पुरुष तरुण मंडळी मोठया संख्येने उपस्थित होती..



# कामोठे मध्ये ऐनदिवाळीत पाण्यासाठी बोंबाबोंब!!!

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)**

दिवाळीत अभ्यंग स्नान होत असताना कामोठे मध्ये मात्र प्रचंड प्रमाणात पाणी टंचाई आहे. पाणी नसल्याने नागरिक संतापले आहेत. कामोठे वसाहती मधील सेक्टर 6अ, 6, 9, 17,18,19, 22,23,24 मध्ये नागरिकांना पाणी पिण्यासाठी वापरायचे कि अभ्यंग स्नान करायचे हा प्रश्न पडलेला आहे.

गेल्या 2-3 महिन्यात सिडको कडून कोणतीही ठोस आश्वासन मिळत नसल्याने कामोठेकर जनतेने महाविकास आघाडी कामोठे विभाग मार्फत सिडकोच्या पाणी पुरवठा विभाग सेक्टर 6 अ मध्ये मा. आ. बाळाराम पाटील यांच्या नेतृत्वाखाली ठिय्या आंदोलन केले, यावेळी महिलांनी सिडकोच्या अधिकाऱ्यांना अक्षरशः धारेवर धरले, शेवटी सिडकोच्या अधिकाऱ्यांकडून सेक्टर 17 आणि 18 मध्ये नवीन पाईप 23 तारखे पर्यंत आणण्यात येईल तर प्रत्यक्ष काम 27 ऑक्टोबर ला सुरु होईल. तसेच सेक्टर 34,35 आणि 36 मध्ये नवीन पाईप लाईन चा प्रास्तव मान्यते करिता पाठवला असून एक महिन्यात निविदा काढण्यात येतील. तर ज्या ठिकाणी कमी पाणी पुरवठा होतो तिथे तात्पुरता स्वरूपात काही दिवसांसाठी टँकर द्वारे पाणी पुरवण्यात येईल, लवकरच कामोठे परिसराला नियमित पाणी पुरवठा सुरु होईल असे लेखी आश्वासन दिल्या नंतरच नागरिकांनी ठिय्या आंदोलन मागे घेतले. यावेळी मा. आ. बाळाराम पाटील यांच्या सोबत मा. नगरसेवक शंकर म्हात्रे, प्रमोद भगत, सखाराम पाटील, लिना गरड, शेकाप कामोठे शहर अध्यक्ष अमोल शितोळे, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रभाकर गोवारी, महानगर प्रमुख अवचित राऊत, रंजना सलोडीकर, रमेश गोरे, उषा झणझणे, संगीता राऊत, रेवती सकपाळ, कुणाल भेंडे, सुनील शिरीषकर, मनसे शहर अध्यक्ष मनोज कोठारी, रुपाली धिवार, संतोष गोळे, गणेश खांडगे, बापू साळुंखे, अनिल पवार, नाना भगत, बबन गोगावले, विश्वास भगत, सचिन झणझणे, ज्ञानेश्वर म्हात्रे, मधुकर सुरते, प्रमोद म्हात्रे, राहुल पाखरे तसेच बहुसंख्येने विविध सोसायटी मधील रहिवाशी उपस्थित होते.




> आम्ही पनवेल पालिकेचे रहिवाशी आहोत, पण पनवेल महानगर पालिका मात्र सिडको कडे बोट दाखवून आमच्याकडून कर वसुल करते, पालिकेने आम्हाला फक्त पैशासाठी पालिकेत घेतले आहे असे वाटते
> - अमोल शितोळे, शेकाप कामोठे शहर अध्यक्ष

> अभ्यंग स्नानाच्या दिवशी अंघोळीला आणि पिण्यासाठी पाणी नाही या पेक्षा दुसरी शोकांतिका नाही.
> - राहुल पाखरे, रहिवाशी, शिव कल्पतरू आर्केड सेक्टर 17, कामोठे

# वर्चस्व ग्रुप व प्रशांत उंबरे मित्रपरिवार कडून सामाजिक उपक्रम

## दीपावलीनिमित्त आश्रमामधील मुलांना मिठाई व फटाके वाटप

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

वर्चस्व ग्रुप भिगवण व मा प्रशांत उंबरे मित्रपरिवार इंदापूर यांच्या माध्यमातून दीपावली पाडवानिमित्त बोरी येथील अनाथ आश्रममधील लहान मुलांना दिवाळी फराळ व फटाके वाटप हा सण साजरा करण्यात आला त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले त्यांच्या कार्यामुळे समाजाला खूप मदत झाली आहे हे कार्य खरोखरच कौतुकास्पद आहे. समाजासाठी केलेले हे योगदान खूप मौल्यवान आहे तुमच्या या सामाजिक कार्यामुळे खूप आनंद झाला आहे तुम्ही सगळेच खरोखरच प्रेरणादायी आहे तुमच्या या कार्यामुळे समाजाला नवी दिशा मिळाली आहे तुम्ही खरोखरच कौतुकास पात्र आहात इतिहास हा नेहमी समाजासाठी काम करणाऱ्यांची दखल घेतो आणि तुमची ही दखल नक्कीच घेतली जाईल तुमचे काम पाहून इतरही तुमच्या कामांमध्ये सामील होतील आणि समाजा साठी तुमच्याकडून अशीच सेवा घडेल अशी अपेक्षा व्यक्त करतो असे आपल्या कौतुक भाषणात अनाथ आश्रम चालक वाघमोडे पाटील यांनी गौरवउदगार काढले



आजच्या भेटीमुळे एक वेगळाच अनुभव व मानसिक समाधान भेटले खूप खूप अभिनंदन वर्चस्व ग्रुप तर्फे व प्रशांत मामा उंबरे युवा मंच यांच्या तर्फे अनाथ आश्रम मधील मुलांना मिठाई वाटप व फटाके वाटपनिमित्त असच सगळ्यांनी सहकार्य ककेले असून सर्व ग्रुपच्या टिम ने माझ्या शब्दाचा मान राखुन आल्याबद्दल मनापासून आभार व धन्यवाद तुम्ही सर्वांनी माझ्यासाठी आपला सण बाजुला ठेवून आल्या बद्दल खरंच आभार व धन्यवाद बोलण्यासाठी सुध्दा शब्द नाहीत.

तुमच्या सर्वांचे उपकार माझा सारखा छोटासा कार्यकर्ता कधीचं विसरणार नाही मी स्वतः ला खुप भाग्यवान समजतो कि परमेश्वराने मला तुमच्या सारखे कट्टर मित्र दिले आहेत.

हे कोणाच्या ही नशिबात नसतात असं आपल्या आभार भाषणात वर्चस्व ग्रुप भिगवणचे संस्थापक अध्यक्ष मा.संतोष भाऊ कुताळ यांनी केले यावेळी भावी नगरसेवक प्रशांत मामा उंबरे वर्चस्व ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संतोष भाऊ कुताळ उपाध्यक्ष राहुल दादा भागडे कार्याध्यक्ष अशोक दादा विटकर सचिव विशाल भाऊ शिंदे संघटक अमोल जाधव अमोल सुभेदार डॉ.मिनल चव्हाण व विक्रम चव्हाण हे उपस्थित होते

# रायगड सम्राट संपादक शंकर वायदंडे यांना ब्ल्यू पँथर्सचा 'मौल्यवान रत्न' पुरस्कार




**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

पनवेल तालुक्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चलवळीत सक्रिय असणारे पत्रकार, संगीत, गायन आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यासाठी ब्ल्यू पँथर्स या संघटनेने विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या विशेष कार्यक्रमात आदिवासी समाजाला न्याय देणारे आणि सत्यताने चलवळीत सक्रिय असणारे पंचशील नगर रहिवाशी सामाजिक संस्थेचे अध्यक्ष तथा पत्रकार शंकर वायदंडे यांनी सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय काम करत असल्याने 'ब्ल्यू पँथर्सचा 'मौल्यवान रत्न' पुरस्कार कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनील सोनावळे यांच्या हस्ते पनवेल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे देण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष नरेंद्र गायकवाड होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल शहर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक नितीन ठाकरे, पनवेल महानगरपालिकेचे माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार, विजय गायकवाड, सुनील सोनावणे, पत्रकार संजय कदम, महेश साळुंखे, कमलाकर कांबळे, नितीन कांबळे, नवनीत गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राज सदावर्ते यांनी केले, तर कृष्णा गायकवाड यांनी आभार मानले.

# "आदर्श भारत माझा" दिवाळी अंकाचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते प्रकाशन संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल/आण्णासाहेव आहेर:**

पत्रकारितेच्या सशक्त परंपरेला व समाजातील उल्लेखनीय व्यक्तिमत्त्वांच्या कार्याला उजाळा देणारा "आदर्श भारत माझा" चा दिवाळी अंक लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या शुभहस्ते लक्ष्मीपूजन दिनाचे औचित्य साधत मंगळवार दिनांक २१,ऑगस्ट रोजी ठाकूर यांच्या पनवेल येथील बंगल्यावर प्रकाशन करण्यात आले.

या प्रसंगी पनवेल तालुका पत्रकार संघर्ष समितीचे व पनवेल युवा चे संपादक अध्यक्ष निलेश सोनावणे, दैनिक युवक आधार चे संपादक संतोष आमले,कोकण दर्पण चे संपादक संजय महाडिक,रायगड सम्राट चे संपादक शंकर वायदंडे, आदिवासी सम्राट चे संपादक गणपत वारगडा, टीव्ही वन इंडिया चे संपादक लालचंद यादव,फोर के चॅनल चे संपादक गौरव जहागीरदार,संपादक आप्पासाहेब मगर, लढवय्या रोखठोक चे संपादक शैलेश चव्हाण,दीपक धरत,क्षितिज पर्व चे संपादक सनिप कलोते,युथ महाराष्ट्र चे संपादक दिपाली पारसकर,तसेच दैनिक युवक आधार प्रतिनिधी राजेंद्र कांबळे व मुकुंद कांबळे,यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

प्रकाशन प्रसंगी बोलताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी "आदर्श भारत माझा" दिवाळी अंकाला मनःपूर्वक शुभेच्छा देत संपादक आण्णासाहेब आहेर यांच्या पत्रकारितेतील कार्यालाही शुभेच्छा देत उपस्थित सर्व पत्रकारांना समाजासाठी काम करण्यासाठी ऊर्जा दिली

यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उपस्थित सर्व पत्रकार बांधवांना,संपादकांना तसेच वाचक वर्गाला दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.प्रकाशन प्रसंगी उपस्थित सर्व मान्यवरांनी "आदर्श भारत माझा" दिवाळी अंकाचे अभिनंदन करत,पत्रकारितेच्या क्षेत्रातील सातत्यपूर्ण प्रामाणिक प्रयत्नांना शुभेच्छा दिल्या,या भव्य सोहळ्याने पत्रकार बांधवांमध्ये एकात्मता, सृजनशीलता आणि पत्रकारितेच्या मूल्यांप्रती नवी ऊर्जा निर्माण झाली.

